दैनिक
# समर्थ राजयोग
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
SAMARTH RAJYOG
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -२०४ शनिवार,दि.२९ मार्च २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-204 Saturday, Dt.29 March 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# सरकारकडून विधिमंडळाच्या विविध समित्या जाहीर!

## भुजबळ अन् मुंडेंचा समितीमधून 'पत्ता कट'

मुंबई : राज्याच्या राजकारणातून एक मोठी बातमी समोर आली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन संपताच सरकारकडून विधिमंडळाच्या विविध समित्या जाहीर करण्यात आल्या आहेत. राष्ट्रवादीच्या वतीने वेगवेगळ्या आमदारांना विधिमंडळाच्या विविध समित्यांमध्ये स्थान देण्यात आले आहे.मात्र, माजी मंत्री छगन भुजबळ आणि धनंजय मुंडे यांना एकाही समितीत नेमणूक करण्यात आलेले नाही. अजित पवारांनी वादग्रस्त असलेल्या धनंजय मुंडे आणि छगन भुजबळ यांना लांब ठेवण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे दोन दिवसांपूर्वीच विधिमंडळाच्या विविध समित्या जाहीर करण्यात आल्याच्या माहिती आहे. विधिमंडळाच्या विविध समित्यांमध्ये विविध समिती प्रमुख आणि समिती प्रमुख म्हणून विविध आमदारांची वर्णी लागल्याचे पाहायला मिळत आहे. मात्र,



राष्ट्रवादीच्या कोअर कमिटीमधील दोन महत्त्वाच्या नेत्यांचा पत्ता कट झाल्याचे दिसत आहे. माजी मंत्री असलेले धनंजय मुंडे आणि छगन भुजबळ यांना कुठेच कोणत्याही समिती स्थान दिले गेले नाही. त्यामुळे अजित पवार यांनी जाणीवपूर्वक वादग्रस्त असलेले धनंजय मुंडे यांना समितीत स्थान न देता चार हात लांब ठेवल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# म्यानमारमध्ये ७.७ तीव्रतेचा भूकंप

## बँकॉकमध्ये इमारत कोसळून ८० जण बेपत्ता, ३ जणांचा मृत्यू

**१४४ जणांचा मृत्यू:७३२ जखमी**

नेपिता / प्रतिनिधी

भूकंपाच्या धक्क्यामुळे बँकॉकमध्ये बांधकाम सुरू असलेली एक इमारत कोसळली. येथे ढिगाऱ्याखाली अनेक लोक अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. - उर्ळीूंर चरीरींहळ

भूकंपाच्या धक्क्यामुळे बँकॉकमध्ये बांधकाम सुरू असलेली एक इमारत कोसळली. येथे ढिगाऱ्याखाली अनेक लोक अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.शुक्रवारी सकाळी ११:५० वाजता म्यानमारमध्ये ७.७ तीव्रतेचा भूकंप झाला. भारत, थायलंड, बांगलादेश आणि चीनसह पाच देशांमध्ये त्याचे धक्के जाणवले. म्यानमार आणि थायलंडमध्ये सुमारे १५० जणांना आपला जीव गमवावा लागला आहे.

म्यानमारमध्ये १४४ जणांचा मृत्यू झाला, तर येथे ७३२ जण जखमी झाले. त्याच वेळी, थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये बांधकाम सुरू असलेली ३० मजली इमारत कोसळली. या साईटवर ४०० लोक काम करत होते. यापैकी ८० लोक बेपत्ता आहेत,

# महिला आणि युवकांनी कालव्याच्या पाण्यात उतरू नये

## गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांचे आवाहन

गेवराई ।प्रतिनिधी

जायकवाडी धरणाच्या उजव्या कालव्यात सध्या पाण्याचे आवर्तन सुरु असून पाण्याच्या प्रवाहाला मोठा वेग आहे. काही हौशी युवक पोहण्यासाठी आणि माताभगिनी कपडे धुण्यासाठी कालव्यात उतरताना दिसत आहेत. पाण्याचा प्रवाहाचा अंदाज न आल्यामुळे मागील आठवड्यात दोन युवकांना प्राण गमावण्याची दुर्दैवी घटना घडलेली आहे. त्यामुळे युवक मित्रांनी आणि माताभगिनींनी पैठण उजव्या कालव्याच्या पाण्यात उतरू नये, पोहण्याच्या क्षणिक आनंदाच्या मोहापायी स्वतःचे आयुष्य उध्वस्त करून नका असे भावनिक आवाहन गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

गेवराई तालुक्यातून जाणाऱ्या पैठण उजव्या कालव्यामधील पाण्यात बुडून मागील आठवड्यात दोन तरुणांचा मृत्यु झाला. या दुर्दैवी घटनेनंतरही कालव्यात




पोहणे आणि कपडे धुण्याचे प्रकार थांबत नाहीत, या पार्श्वभुमीवर आ.विजयसिंह पंडित यांनी त्यांच्या सोशल मिडीयाद्वारे मतदार संघातील नागरीकांना कालव्याच्या पाण्यात उतरू नका असे भावनिक आवाहन केले आहे. या बाबत बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, जायकवाडी धरणाच्या पैठण उजव्या कालव्यातून पाण्याचे आवर्तन सुरु आहे. दि.५ एप्रिलपर्यंत हे आवर्तन सुरु राहणार असून पुन्हा दि.२५ एप्रिल पासून दुसरे व त्यानंतर आणखी एक आवर्तन मिळणार आहे. पैठण उजव्या कालव्याच्या वहन क्षमता पुर्नस्थापित करण्याची कामे मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळे सध्या सुमारे १४०० क्युसेस पाणी कालव्यातून वाहत आहे. मौजे तळणेवाडी, धोंडराई या भागात कालव्यातील पाण्याची उंची सुमारे १० फुट असून तलवाडा, रामपुरी या भागात ती थोडी कमी होते. त्याचबरोबर पाण्याच्या प्रवाहाचा वेग प्रचंड आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे हौशी युवक आणि विद्यार्थी कालव्याच्या पाण्यामध्ये पोहताना दिसतात. आ.विजयसिंह पंडित रामपुरी व परिसरातील गावांच्या दौऱ्यावर असताना त्यांना काही युवक पाण्यात

(उर्वरीत पान २ वर)

# माजलगाव मधून सोन्या चांदीचे दागिने चोरून नेले

## अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल

माजलगाव ।प्रतिनिधी

येथील सम्राट अशोक नगर भागातील कुशाग्र महेश लऊळकर,यांचे घरी दि.२८/ ०३ /२०२५ रोजी रात्री ०१.३० ते ६ वा.चे पूर्वी घरातील लोखंडी कपाटामध्ये ठेवलेले सोन्याचे व चांदीचे दागीने,मोबाईल व पासपोर्ट हे कोणीतीर अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून घराची कडी उघडून लोखंडी कपाटाचे लॉक उघडून आत ठेवलेले सोन्या चांदीचे दागीने चोरून घेऊन गेले आहे.



कुशाग्र महेश लऊळकर,हे वरील ठिकाणचा राहणारे असून जयमहेश कारखाना येथे इलेक्ट्रीक इंजिनियर म्हणुन काम करतात.ते जय महेश कारखाना येथून ड्युटी करून रात्री अंदाजे ११वा.चे सुमारास घरी आले.खालच्या एका रुमची कडी लावून खालीच समोरील रुममध्ये झोपी गेले होते.रात्री अंदाजे ०१.३० ते पहाटे ०५.३० वा.चे दरम्यान सगळेजन झोपी गेलोत.त्यानंतर त्यांची पत्नी ही सकाळी ०६.०० वा.चे सुमारास जाग आल्याने उठून बाहेर आली व पाहीले असता तिला समोरील रुमची कडी उघडी दिसली.त्यावर तिने फिर्यादीस उठवीले व ते दोघे रुम मध्ये जावून पाहीले असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने घराचे लोखंडी गेट वरून येऊन घरात प्रवेश केला असावा.कुटुंबातील लोक झोपलेल्या घरा समोरील रुमची कडी उघडून आतप्रवेश करून कपाट उघडून कपाटात ठेवलेले सोन्या चांदीचे दागीने एका कापडी पिशवी मध्ये ठेवलेले ते चोरून घेऊन गेले आहे. सदर सोन्या चांदीचे दागीने वर्णन खालील प्रमाणे

एक सोन्याचे गंठन १५ ग्रॅम वजनाचे प्रति ग्रॅम किं.अं ३००० रुपये प्रमाणे एकुण किं.४५०००/-रुपये,एक जोड सोन्याचे

(उर्वरीत पान २ वर)



# विवादित शक्तीपीठ महामार्ग निर्मितीला सुरुवात

## तालुक्यातील प्रस्तावित गावामध्ये सीमांकन प्रक्रिया सुरू

परळी / अनुप कुसुमकर (भावसार )

पवणार ते पत्रादेवी या शीघ्र दृतगती शक्तिपीठ मार्गास राज्यात शेतकऱ्यांना कडाडून विरोध होत असून देखील राज्य सरकार हा प्रस्तावित महामार्गास निर्मितीसाठी हालचाली वेगाने सुरू केली आहे. परळी तालुक्यात ज्या गावातुन हा महामार्ग प्रस्तावित आहे त्या ठिकाणी राज्याच्या रस्ते विकास महामंडळामार्फत नियुक्त कंपनीकडून सीमांकन प्रक्रिया सुरू झाली आहे.

नागपूरपासून गोव्यादरम्यान महाराष्ट्रातील धार्मिक स्थळे जोडण्यासाठी, तसेच पर्यटनाला चालना देण्यासाठी मागणी नसताना देखील समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर आणखी लांब पल्ल्याचा शक्तीपीठ द्रुतगती मार्ग उभारण्यात येणार आहे.राज्यातील १२ जिल्ह्यातून जाणाऱ्या या महामार्गासाठी २७ हजार एक्कर पेक्षा अधिक शेतजमीन शासन संपादित करणार आहे. नागपूर-रत्नागिरी महामार्ग अस्तित्वात असताना देखील हजारो कोटी रुपयांचे कर्ज घेऊन शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून शेतकऱ्यांना भूमिहीन करण्याचे काम सरकार कडून होत असल्याचे लक्ष्यात येताच राज्यात या महामार्गास तीव्र विरोध होत आहे.

मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यातून शक्तीपीठ महामार्ग हा प्रस्तावित असून हा मार्ग अत्यन्त सुपीक आणि बागायती जमिनीतून जाणार आहे. त्यामुळे मराठवड्यातील खूप मोठी बागायत जमीन या महामार्गामध्ये जाऊन कायमस्वरूपी शेतकरी कायमचे भूमिहीन होणार आहेत. या शक्तिपीठ महामार्गास शेतकरी विरोध करण्याच्या अनुषंगाने १३ एप्रिल २०२४ रोजी परळी येथे मराठवाड्यातील बाधित शेतकऱ्यांची विभागीय बैठक संपन्न झाली.या बाबत शेतकऱ्यांनी मराठवाडाभर संवाद यात्रा देखील काढली.

(उर्वरीत पान २ वर)

# देगलूर-बिलोली आगाराला २० नव्या बसांची भेट

## आ. जितेश अंतापूरकर यांच्या प्रयत्नांना यश

देगलूर ।प्रतिनिधी

देगलूर - देगलूर-बिलोली एस.टी. आगारासाठी मोठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. अखेर मतदारसंघातील प्रवाशांच्या सोयीसाठी २० नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे स्थानिक नागरिकांमध्ये आनंदाचे



वातावरण असून, यासाठी आग्रही पाठपुरावा करणारे आमदार जितेश अंतापूरकर यांचे आभार व्यक्त केले जात आहेत.संबंधित विभागाने याबाबत अधिकृत आदेश जारी केले असून, देगलूर आगारासाठी १० आणि बिलोली आगारासाठी १० अशा एकूण २० नवीन बसेस लवकरच रस्त्यावर धावताना दिसणार आहेत. या निर्णयामुळे प्रवासाची गैरसोय दूर होईल आणि एस.टी. सेवेचा अधिक चांगला लाभ नागरिकांना मिळणार आहे.मतदारसंघातील प्रवाशांना सुरक्षित आणि सुटसुटीत सेवा मिळावी, यासाठी आमदार अंतापूरकर यांनी सातत्याने प्रयत्न केले होते. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून, येत्या काही दिवसांत या बसेस प्रवाशांच्या सेवेसाठी दाखल होतील.प्रवाशांनी या निर्णयाचे स्वागत करत आमदार अंतापूरकर यांचे आभार मानले आहेत. नवीन बसेस उपलब्ध झाल्याने नागरिकांचा प्रवास अधिक सुलभ आणि सोयीस्कर होणार आहे.

# पवनचक्की कंपन्यांची दांडगाई वाढली

## पोलिसां समोरच वार्तांकन करणा-या पत्रकाराचा मोबाईल हिसकावून शिविगाळ - डॉ . गणेश ढवळे



बोरखेड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारात वरचेवर वाढ होत असून आज बीड तालुक्यातील बोरखेड येथील शेतकरी मावेजा मिळावा म्हणून टावर वर चढलेले असताना त्यांचे वार्तांकन करणा-या दैनिक हिंद जागृतीचे उपसंपादक मुस्तफा पठाण यांचा मोबाईल पवनचक्की कंपन्यांच्या पाळलेल्या गुंडानी हिसकावून घेत शिविगाळ करत धमकावल्याचा प्रकार घडला असुन यामुळे शेतकऱ्यांमध्ये दहशतीचे सावट पसरले आहे.पोलिस प्रशासनासमोर जर पवनचक्की कंपन्यांच्या लोकांची मजल पत्रकारांना दमदाटी करण्यापर्यंत जात असेल तर सर्वसामान्य शेतकऱ्यांना किती अडचणीचा सामना करावा लागत असेल असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला आहे.

जिल्ह्यधिकारी आणि पोलिस अधीक्षक बीड यांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले आहे. मावेजा न देताच तार ओढण्याचे काम सुरू ; दिड महिन्यांपूर्वी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना लेखी तक्रार करूनही कारवाई नाही - आदमखां पठाण ( पिडीत शेतकरी)

बीड तालुक्यातील बोरखेड शिवारातील गट नंबर ५६३ आणि गट नंबर ५७० मधील शेतजमिनीवरून रिन्यु पवनचक्की कंपनीचे उच्च

(उर्वरीत पान २ वर)

### वार्तांकन करताना मोबाईल हिसकावून दमदाटी केली पोलिस अधीक्षक यांना तक्रार करणार - पत्रकार मुस्तफा पठाण

आदमखां पठाण यांनी फोन केल्यानंतर वार्तांकन करण्यासाठी मी आलो होतो. पिडीत शेतकरी टावर वर चढले असताना त्याचे व्हिडिओ शूटिंग मी करत असताना पवनचक्की कंपन्यांचा शेवाळे नावाच्या माणसाने माझ्या गळ्यात पत्रकाराचे ओळखपत्र असतानाही माझा मोबाईल हिसकावून घेतला आणि तु इथं कशाला आला ? तुम्हाला फार माज चढलाय ; कशाला बातम्या करता अशा प्रकारे दमदाटी केली.याप्रकरणी आम्ही पत्रकार संघटना पोलिस अधीक्षक बीड यांना लेखी तक्रार करून लेखणी बंद आंदोलन करणार आहोत. पत्रकारांवर दडपशाही आम्ही खपवून घेणार नाही.

### उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवणे आवश्यक - डॉ.गणेश ढवळे

तालुका स्तरावर ऊर्जा कंपनी संदर्भात संनियंत्रण समितीचे अध्यक्ष उपविभागीय अधिकारी तर सचिव तहसीलदार असतात. शेतकऱ्यांच्या तक्रारीची दखल घेत शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत तंटा होऊ नये यासाठी प्रयत्न करणं आवश्यक आहे.मात्र जिल्हा प्रशासन याबाबत उदासीन असुन पवनचक्की कंपन्यांनी सशुल्क पोलिस संरक्षण घेऊन शेतकऱ्यांवर दबाव आणणे, दडपशाही करणे सुरूच असुन जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक बीड यांनी दखल घेणे गरजेचे असल्याचे मत डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केले.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

संपादकीय

# एकतर्फी न्याया’ला पाचर

नागपूरमध्ये झालेल्या दंगलीने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. महाल भागातील या हिंसाचाराचा सूत्रधार फहीम खान असल्याचा पोलिसांचा प्राथमिक तपासातील दावा आहे. शहराच्या संजयबाग कॉलनीतील फहीम खानचे घर बेकायदा असल्याचा आरोप करीत नागपूर महापालिकेने त्याच्यावर बुलडोझर चालविला.

नागपूरमध्ये झालेल्या दंगलीने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. महाल भागातील या हिंसाचाराचा सूत्रधार फहीम खान असल्याचा पोलिसांचा प्राथमिक तपासातील दावा आहे. शहराच्या संजयबाग कॉलनीतील फहीम खानचे घर बेकायदा असल्याचा आरोप करीत नागपूर महापालिकेने त्याच्यावर बुलडोझर चालविला. लीजचे नूतनीकरण न करता; तसेच महापालिकेची परवानगी न घेता घराचे बांधकाम केल्याचा फहीमवर ठपका आहे. त्याचा साथीदार अब्दुल हफीज याच्याही घराचे पाडकाम झाले. या कारवाईला फहीमच्या आईने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने अशा पाडकामासाठी मागील नोव्हेंबर महिन्यात काही नियम निश्चित केले आहेत. ही कारवाई या नियमांनुसार झाली नसल्याचे अधोरेखित करीत, नागपूर खंडपीठाने या पाडापाडीला अंतरिम स्थगिती दिली. यातून खरा प्रश्न निर्माण झाला. याआधीचे एक प्रकरण सिंधुदुर्ग जिल्ह्यातले. या जिल्ह्यातील एका कुटुंबावर चॅम्पियन्स ट्रॉफीतील भारत-पाकिस्तानमधील क्रिकेट सामन्यादरम्यान भारतविरोधी घोषणा दिल्याचा आरोप होता. या केवळ आरोपातून त्यांचे घर पोलिसांनी नियमभंग दाखवीत पाडल्याची याचिका किताबुल्ला हमिदुल्ला खान या व्यक्तीने दाखल केली. यावर न्यायालयाने उत्तर मागविले आहे.

कोणत्याही अनधिकृत इमारतीच्या पाडकामापूर्वी मालक किंवा रहिवाशाला किमान पंधरा दिवसांची नोटीस देणे न्यायालयाच्या नियमावलीनुसार सक्तीचे आहे. संबंधित व्यक्तीला स्वत:चा बचाव करण्याची संधी देत, वैयक्तिक सुनावणीसाठी तारीख निश्चित केली जावी. नोटिशीनंतर जिल्हाधिकारी वा जिल्हा मॅजिस्ट्रेट यांना ई-मेलद्वारे सूचित करावे. अधिकाऱ्यांनी बुलडोझर चालविताना पाडकामाचे चित्रीकरण करावे; तसेच निरीक्षण अहवालही नोंदवावा, अशा सूचना या निर्णयात आहेत. कारवाईनंतर आरोप होऊ नयेत, म्हणून अशा कारवाईतील पारदर्शकतेवर न्यायालयाने विशेष भर दिला आहे. कोणत्याही योग्य न्यायप्रक्रियेविना फक्त शिक्षेसाठी पाडकाम करणे अवैध ठरविले जाईल, या महत्त्वाच्या मुद्द्याचा न्यायालयीन नियमात समावेश आहे. राज्यकर्त्यांकडून घटनात्मक मर्यादांचे उल्लंघन होऊ नये, म्हणून ही काळजी घेतली जाणे अपेक्षित आहे; तरीही अनेक ठिकाणी लोकसंतापातून कायदा हाती घेण्याचे प्रकार होतात. राजकीय नेत्यावर टीका करणारे ‘स्टँडअप कॉमेडियन’ कुणाल कामरा यांनी ज्या स्टुडिओमध्ये संबंधित चित्रीकरण केले होते, तो ‘हॅबिटॅट स्टुडिओ’ कार्यकर्त्यांच्या क्षोभाला बळी पडला. प्रशासकीय कार्यालयांकडून होणाऱ्या कारवायांपूर्वी नागरिकांचे संरक्षणहक्क जपणे अपेक्षित असते. मात्र, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशात तर ‘बुलडोझर राज’च्या नावाने धमकावण्याचे प्रकार सर्रास सुरू असतात. पंजाबमधील शेतकऱ्यांनाही अशाच जाचाला सामोरे जावे लागले. सामान्यांना न्यायालयीन प्रक्रियेतून गेल्याखेरीज थेट आरोपी समजणे चुकीचे ठरते. प्रशासकीय व्यवस्थेने स्वत: सुनावणीशिवाय कायदा राबविणे हा अक्षम्य गुन्हा ठरतो. आरोपीचा गुन्हा सिद्ध होण्यासाठी पुरेसा कालावधी दिला गेला नाही, तर ‘झटपट न्याया’च्या मागणीच्या रेट्याखाली सामूहिक अपराध घडू शकतात.

पारदर्शकता आणि न्यायदक्षता ही व्यवस्थेची मुख्य अंग आहेत. संशयिताचे रूपांतर आरोपीत होण्याच्या कालावधीलाच न्यायालयीन सुनावणीची चौकट म्हणतात. त्याचा अव्हेर, म्हणजे न्यायालयांना मिळालेला खो ठरतो. लोकप्रमादाला आळा घालणे, हे सजग लोकप्रतिनिधींचे काम आहे. समूहाला नियंत्रित करणे आणि त्याला कायद्याची जाणीव करून देणे, ही त्यापुढील संयत पायरी आहे. या विधिवत आराखड्यावर करवत चालविणे हा केवळ न्यायालयाचा अवमान ठरत नाही, तर सुबुद्ध समाजाच्या दिशेने जाणारा मार्ग मुद्दाम अवरुद्ध करण्याचाही तो प्रयत्न ठरतो. बेकायदा पद्धतीने घर पाडले असल्यास त्याचा मोबदला द्यावा, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. ‘झटपट न्याय’ हा राजकीय लोकसंतोषाचा विषय होऊ शकतो; सामाजिक समन्यायाचा नव्हे. दंगल आणि अनधिकृत बांधकामे हे तसे भिन्न विषय आहेत. कायद्याचा धाक नसला, तर त्याचा अनावश्यक गैरफायदा घेतला जातो. सामाजिक नियमावली नागरिकांनी पाळली, तर न्यायालयांच्या मध्यस्थीचा विषयच येणार नाही. कुठलाही अतिरेक वा चिथावणी समाजाला पोषक नाही.

# लखपती दीदी उपक्रमांतर्गत बीड जिल्हा राज्यात चौथ्या तर विभागात प्रथम क्रमांकावर

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे अंतर्गत ८१ हजार ४३१ महिला लखपती दीदी झाल्या आहेत. या योजनेला जिल्ह्यात मोठे यश मिळाले आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत 'लखपती दीदी उपक्रम' जिल्ह्यातील काम प्रगतीपथावर आहे. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प संचालक सांगितादेवी पाटील आणि त्यांचे सहकारी उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील असल्याचे दिसून आले आहे.

उमेद अभियानांतर्गत राज्यस्तरावरून लखपती दीदी च्या कामाची रँकिंग जाहीर करण्यात आलेली असून त्यानुसार बीड जिल्हा राज्यात चौथ्या क्रमांकावर आहे तर विभागात प्रथम क्रमांकावर आलेला आहे लखपती दीदी उपक्रम ही शासनाची महत्त्वकांक्षी योजना आहे ग्रामीण भागातील स्वयंसहायता समूहातील महिला मी तिच्या उपजीविकेमध्ये कोणतेही दोन किंवा तीन स्रोत चा वापर करून तिने तिच्या उत्पन्नामध्ये केलेली वाढ ही जर एक लाखापेक्षा जास्त असेल तर अशा महिलांना आपण लखपती दीदी असे समजतो त्यानुसार गाव पातळीवर मोबाईल प मध्ये सीआरपीच्या माध्यमातून ज्या ग्रामीण भागातील महिला स्वयंसहायता समूहातील महिलांचे उत्पन्न हे एक लाख पेक्षा जास्त आहे याची माहिती या मोबाईल प मध्ये घेण्यात येते यामध्ये साठ ते एक लाख एक लाख ते तीन लाख व तीन लाखापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या महिलांची माहिती संकलित केली जाते त्यानुसार बीड जिल्ह्याने लखपती दीदीचे माहिती मोबाईल प मध्ये सीआरपीच्या माध्यमातून एन्ट्री करून घेण्यामध्ये विभागामध्ये प्रथम क्रमांक पटकावलेला आहे हा उपक्रम राबविण्याकरिता प्रभाग संघ ग्रामसंग स्वयंसहायता समूह गावातील समुदाय संसाधन व्यक्ती तसेच तालुकास्तरीय सर्व कर्मचारी यांनी सातत्यपूर्ण नियोजन करून सदरील कामकाज पूर्ण करण्यात आलेले आहे लखपती दीदी उपक्रमाकरिता ग्रामीण भागातील महिला स्वयं सहायता समूहातील महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून महिला या विविध व्यवसाय करीत असून त्याचबरोबर शेती व शेतीपूरक व्यवसायाच्या माध्यमातून स्वतः लखपती दीदी होण्यास इच्छुक आहेत व त्यांचा भरपूर असा प्रतिसाद बीड जिल्ह्यामध्ये मिळत आहे. उमेद अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांना बँक कर्ज पुरवठा उमेद अभियानांतर्गत वितरित करण्यात आलेला समुदाय गुंतवणूक निधी आर एफ खेळते भांडवल गटातील स्वतःची बचत याच्या माध्यमातून महिला विविध व्यवसाय करीत आहेत तसेच या वित्त पुरवठा द्वारे शेती व शेतीपूरक व्यवसाय करून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावत आहेत



राज्यावरून बीड जिल्ह्याला ८८१५५ लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून दिलेल्या उद्दिष्ट उद्दिष्टेपेक्षा जास्तीचे ९० हजार ९०४ लखपती दीदीचे आयडेंटिफिकेशन करण्यात आलेले असून त्यापैकी आज घडीला ९१ हजार ५३० महिलांची माहिती डिजिटल अजिविका रजिस्टर मध्ये नोंद करण्यात आलेली आहे पैकी ८६,३०७ महिलांची इंट्री मोबाईल प मध्ये करण्यात आलेली आहे व ८१४३१ महिला मोबाईल प मध्ये नुसार लखपती झालेले आहेत

उमेद चडठड्च् अभियान अंतर्गत महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून ग्रामीण कुटूंबांच्या समृद्धीसाठी अभियानात विवीध उपक्रम राबविले जात आहेत. ग्रामीण महिलांचे आरोग्य, पोषण व स्वच्छता, शिक्षण , पंचायतराज संस्थामधील सहभाग, शासनाच्या विविध योजनांमधील सहभाग तसेच त्यांच्या कुटूंबामध्ये उपजिवीकेचे शाश्वत स्त्रोत विकसीत करण्यासाठी इतर विभागासोबत कृतीसंगम करुन शाश्वत उपजिवीकेचे साधन उपलब्ध करुन देण्यात येत आहे.. कृतीसंगम विभागामार्फत ग्रामीण महिलांना ईतर शासकीय विभाग जसे कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, समाज कल्याण विभाग, आवास योजना, आरोग्य विभाग, महिला बाल विकास विभाग इत्यादी शासकीय विभागातील योजनेचा लाभ महिलांना मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

बीड जिल्ह्यातील तालुका निहाय पूर्ण करण्यात आलेले उद्दिष्ट पुढील प्रमाणे आहे. अंबाजोगाई १०,०८२, आष्टी ९,४११, बीड ११,३०७, धारूर ३,९८७, गेवराई १२,००४, केज ९,५९०, माजलगाव ८,८१९, परळी ६९३४, पाटोदा ५०५६, शिरूर (कासार) ५,९२५, आणि वडवणी ४,९८०.

बीड जिल्ह्यात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा मार्फत सुरू असलेल्या लखपती दीदी उपक्रमास मोठा प्रतिसाद मिळाला आहे. प्रारंभी जिल्ह्यातील सर्व तालुका आणि गावनिहाय बैठका घेऊन प्रसार आणि प्रचार केल्यामुळे या योजनेला मोठी गती मिळाली आहे. गटविकास अधिकारी यांच्यामार्फत सरपंच आणि प्रतिष्ठित व्यक्तींनाही या योजनेचे महत्त्व समजावून सांगितल्यामुळे बचतगटाच्या माध्यमातून बीड जिल्ह्याला मोठा लाभ मिळाल्याची दिसून आले.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या अंतर्गत अन्य उपक्रमही जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्यात येत आहेत. प्रकल्प संचालिका संगीतादेवी पाटील आणि त्यांचे अधिनस्त अधिकारी व कर्मचारी योजनेच्या यशस्वीतेसाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे दिसून आले आहे.

उमेद अभियानाने दिली नवी उमेद

उमेद अभियान अंतर्गत मिळालेल्या समुदाय गुंतवणूक निधी बँक लिंकेज प्रधानमंत्री सूक्ष्म अन्य योजना पीएमई च्या माध्यमातून मी माझा मसाला चा उद्योग सुरू केलेला असून आज घडीला मी वर्षाला तीन ते चार लाख रुपये उत्पन्न या व्यवसायातून होत आहे त्याचबरोबर अभियानातील मिळालेल्या वित्त पुरवठा द्वारे मी माझ्या शेतीमध्ये मिरची हळद व इतर उत्पन्न घेत आहे माझ्या गटाने बँकेकडून दोन वेळेस तीन लाख रुपये चे कर्ज घेतलेले असून त्या कर्जातून मी माझा मसाला उद्योग हा व्यवसाय सुरू केलेला आहे आज या अभियानामुळे मी माझ्या गेवराई शहरात स्वतःचे मालकीचे वाहकाचे घर बांधलेले असून आज माझा व्यवसाय चांगल्या प्रकारे सुरू आहे

अभियानातील जिल्हा व्यवस्थापक व तालुका व्यवस्थापक व इतर अधिकारी कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली आम्हाला पॅकेजिंग व लेबलिंग चे उत्कृष्ट असे प्रशिक्षण दिल्यामुळे माझ्या मसाला प्रोडक्टला एक आकर्षक रूप मिळालेले आहे. माझे प्रॉडक्ट मुंबई सरस , गेवराई मधील ठोक व घाऊक विक्रेते तसेच मुंबई पुणे नाशिक हिंगोली बार्शी या ठिकाणीही पुरवठा करत आहे

# पाच लाखापर्यंतच्या कर्ज धारकांसाठी गजानन बँकेचा केशर ऋणरक्षा निधी

## मयत कर्ज धारकांच्या वारसांना मोठा दिलासा देणारा निर्णय

बीड ।प्रतिनिधी

जिल्ह्यात नावाजल्या जाणार्या बँकेपैकी एक बँक असणारी श्री गजानन नागरी सहकारी बँकेने कर्ज धारकांसाठी नाविन्यपूर्ण योजना आखली असून बँकेच्या कर्ज धारकांसाठी केशर ऋणरक्षा निधी अंतर्गत वारसांना मोठा दिलासा मिळणार असून पाच लाखापर्यंतच्या कर्ज धारकाच्या निधनानंतर त्यांचे कर्ज ऋणरक्षा निधीच्या माध्यमातून परतफेड करून घेत कर्जदारांच्या वारसांना तसेच जामीनदारांना यातून ऋणमुक्त करण्यात येणार असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी दिली.



श्री गजानन नागरी सहकारी बँकेने सभासद नाममात्र सभासद व कर्मचारी यांना कर्ज वाटप केलेले आहे.मयत झालेल्या कर्ज धारकांना केशर ऋणरक्षा निधी अंतर्गत कर्ज परतफेडची चिंता राहू नये यासाठी पाच लाखापर्यंतच्या कर्ज घेतलेल्या सभासदांचे अचानक निधन झाल्यास सदरील कर्ज परतफेडीबाबत अडचणी येत असतात. घेतलेले कर्ज आणि त्यावरील व्याजाच्या रकमेचा विचार करता बँकेच्या संचालक मंडळाने नावीन्यपूर्ण योजना आखली असून केशर ऋणरक्षा निधी अंतर्गत सभासदाला कर्ज देतानाच एक टक्का व पुढील प्रत्येक वर्षी प्रती लाखाला पाचशे रुपये ऋणनिधी आकारला जाणार असून कर्ज परतफेडीच्या कालावधीत सभासदाचे अचानक निधन झाल्यास या योजनेतून घेतलेले कर्ज बेबाक करून कर्जदारकाचे वारस आणि जामीनदार यांना मुक्त केले जाणार आहे. केशर ऋणरक्षा निधी जानेवारी २०२५ पासून लागू करण्यात आला असून दरम्यानच्या काळात मैदा येथील कृष्णा कारभारी राऊत यांनी या योजनेत सहभाग घेतला होता. १ मार्च २०२५ रोजी कृष्णा राऊत यांचे अल्पशा आजाराने निधन झाले घरातील एकमेव कमावता व्यक्ती गेल्याने कर्जाची चिंता होती. मात्र केशर ऋणरक्षा अंतर्गत राऊत कुटुंबीयांना व जामीनदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निधी अंतर्गत राऊत यांना एक लाख रूपये व अन्य निधी मिळून बँकेने सवलत देत त्यांचे संपूर्ण कर्ज बेबाक केले. कृष्णा राऊत यांच्या कुटुंबीयांना बँकेचे अध्यक्ष माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आणि संचालक मंडळाने केशर ऋणरक्षा निधी अंतर्गत बेबाक प्रमाणपत्र देऊन कर्ज मुक्त केले आहे. गजानन बँकेत पाच लाखापर्यंत कर्ज घेणार्या सभासदांची संख्या १२०७ असून या निधी अंतर्गत या सभासदांना मोठा दिलासा मिळणार आहे. ऋणरक्षा निधीची सवलत मिळवण्यासाठी मयत कर्जधारकांच्या वारसांनी कर्जधारकांचे मृत्यू प्रमाणपत्र व अर्ज बँकेत दाखल करावा कर्ज घेतलेल्या कर्ज धारकाचा मृत्यू एक वर्षाच्या आत झाल्यास ५० टक्के,एक वर्षानंतर ७५ टक्के,आणि दोन वर्षानंतर शंभर टक्के कर्ज ऋणरक्षा निधी अंतर्गत सवलत देऊन माफ करण्यात येणार आहे, सभासदांनी अधिक माहितीसाठी बँकेचे संचालक तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, शाखाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन बँकेचे अध्यक्ष माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, उपाध्यक्ष जगदीश काळे यांनी केले आहे.



# ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना डोंगरी प्रमाणपत्र तात्काळ मिळावे -रतन गुजर

बीड ।प्रतिनिधी

ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना डोंगरी प्रमाणपत्र तात्काळ मिळावे व त्यातील जाचक अटी कमी कराव्यात या मागणीचे निवेदन बीड तहसीलदार यांना दि.२८ मार्च २०२५ रोजी अ.भा.गुजर देवसेनाच्या वतीने जिल्हाध्यक्ष रतन गुजर शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष उल्हास गिराम व सर्व समाज बांधव आणि शिवसैनिकांच्या वतीने देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डोंगरी प्रमाणपत्र तात्काळ मिळावे व काही जाचक अटी असतील त्या कमी कराव्यात, विद्यार्थ्यांना सहकार्य करावे तसेच जे डोंगरी विभागामध्ये समाविष्ट झालेले गावे आहेत त्या गावातील लोकांनी युवकांनी पुढे येऊन आपले प्रमाणपत्र काढून घ्यावे असे आवाहन पत्रकाच्या माध्यमातून यावेळी करण्यात आले. प्रशासकीय काही अडचणी आल्यास आम्ही समाजाच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहून युवकांनी व समाजाने पुढे यावे व प्रमाणपत्र लवकरात लवकर काढून घेऊन त्याचा फायदा करून घ्यावा असे आवाहन गुजर समाजाचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी केले यावेळी पत्रकाद्वारे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी म्हटले आहे की, गुजर समाजाच्या काहीही अडचणी असू द्या त्यासाठी मी तत्पर उभा राहून अडचणी सोडून घेण्यासाठी मी आणि शिवसैनिक गुजर समाजासोबत खंबीरपणे उभे आहोत

याप्रसंगी गुजर समाजाचे माजी जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ, अ भा देवनारायण सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील गुजर, जिल्हा संघटक अरुण खटाणे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजाभाऊ गुजर, शहर प्रमुख हनुमान बहिरवाळ, नवनाथ प्रभाळे, संजय भाई महाद्वार, सुशील पिंगळे, राजाभाऊ महूवाले, बंटी भैया परदेशी, प्रदीप कोटुळे व इतर शिवसैनिक व गुजर समाज बांधव उपस्थित होते

# दादासाहेब सादोळकर २५ हजाराचे बक्षीस

बीड ।प्रतिनिधी

भारतीय डाक खात्याने आयोजित केलेल्या 'ढाई आखर' राजकीय लेखन स्पर्धेत बीड येथील सुप्रसिद्ध वात्रटिकाकार दादासाहेब सादोळकर यांचा प्रथम क्रमांक आल्याबद्दल त्यांचा पोस्टमास्तर जनरल महाराष्ट्र सर्कलचे अमिताभ सिंह यांच्या हस्ते दिनांक २५ मार्च २०२५ रोजी मुंबई येथे सन्मानपत्र व २५ हजार धनादेश देऊन सन्मान करण्यात आला.



सदर स्पर्धेचा विषय 'डिजिटल युगात पत्रलेखनाचा आनंददायी अनुभव' हा होता. आंतरदेशीय पत्रावर सादोळकर यांनी लेखन केले होते. त्यांच्या या यशाबद्दल बीडचे प्रधान पोस्टमास्तर हेमंत पानखेडे, सहाय्यक पोस्ट मास्तर सचिन काळे यांचेसह त्यांच्या मित्र परिवारांनी अभिनंदन केले.कार्यक्रमास विजयी उमेदवारासह नातेवाईक व हितचिंतक उपस्थित होते. तसेच दादासाहेब सादोळकर यांचे बंधू प्रल्हाद सादोळकर हे याप्रसंगी उपस्थित होते

# महात्मा बसवेश्वर सामाजिक समता शिवा पुरस्कारासाठी व्यक्ती आणि संस्थांना आवाहन

बीड ।प्रतिनिधी

वीरशैव लिंगायत समाजाच्या सामाजिक शैक्षणिक आर्थिक विकास होण्यासाठी कलात्मक समाज प्रबोधन व साहित्य क्षेत्रात कार्य करणारे कलावंत, साहित्यिक, समाजप्रबोधनकार आणि समाजसेवकांना तसेच समाजासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना प्रतिवर्षी वैशाख शुद्ध अक्षय्य तृतीयेच्या दिवशी एक व्यक्ती, एक संस्था यांना महात्मा बसवेश्वर सामाजिक समता किंवा पुरस्कार देण्यात येणार आहे.

प्रस्ताव सादर करतांनी वीर शैव लिंगायत समाजासाठी करण्यात आलेले कार्य यासंदर्भातील माहिती व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. त्याबाबतचे प्रस्ताव विहीत नमुन्यात दिनांक ११ एप्रिल २०२५पर्यंत सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन. तिसरा मजला,बीड येथे विहित नमुन्यात दाखल करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण चे सहाय्यक संचालक बीड यांनी केले आहे.

# अग्नीवीर सैन्य भरतीसाठी ऑनलाईन नोंदणी

बीड ।प्रतिनिधी

अग्निपथ योजनेअंतर्गत वर्ष २०२५-२०२६ साठी होणाऱ्या अग्नीवीर भरतीसाठी अविवाहित पुरुष, अविवाहित महिला उमेदवारांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठीची अधिसूचना्.क्षेळपळपवळरपरीू.पळल.ळप वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ऑनलाइन अर्ज स्वीकारण्याची तारीख १२ मार्च ते १० एप्रिल २०२५ आहे.

सामान्य प्रवेश परीक्षा संभवतः जून महिन्यात प्रसिद्ध करण्यात येईल. हे भरती अर्ज आहिल्यानगर, बीड, लातूर, धाराशिव, पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील उमेदवार १२ मार्च १० एप्रिल २०२५ पर्यंत भरू शकतात. तरी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी या संधीचा लाभ घेऊन दिनांक १० एप्रिल २०२५ पूर्वी नोंदणी करावी, असे आवाहन कर्नल शरद पांढरे (नि.) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी बीड यांनी केले आहे.

पान १ वरून...

**विवादित शक्तीपीठ ..**

निवडणूकीच्या तोंडावर सरकार कडून हा महामार्ग होणार नाही असे सांगण्यात येत होते मात्र परत सत्तेवर आल्यावर सरकारने हा महामार्ग निर्मितीसाठी वेगाने हालचाल सुरू केली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी प्रस्तावित महामार्ग ज्या गावातुन जाणार आहे तिथे सीमांकन करण्याचे काम मोणार्च या खाजगी कंपनीकडे सोपविले असून या कंपनी मार्फत शुक्रवार दि २८ रोजी परळी तालुक्यातील इंडपवाडी-डाबी शिवारात सीमांकन प्रक्रिया पूर्ण केली आहे. परळी तालुक्यातील इंजेगाव, कौठळी, तळेगाव, डाबी, भोपळा, कनेरवाडी या गावातून प्रस्तावित आहे. सबंधित गावातील सीमांकन झालेल्या जमिनी संपादित करण्यासाठी उपविभागीय कार्यालय परळी यांना शासनाकडून प्रस्ताव प्राप्त झाला असून याबाबत संपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत लवकरच नियोजन होणार आहे.

परळी तालुक्यातील शेकडो एक्कर सुपीक, बागायती जमीन संपादित करून शेतकऱ्यांना कायम स्वरूपी भूमिहीन करत भिकेला लावणारा हा शक्तीपिठ महामार्ग असून विधान सभा निवडणुकीच्या तोंडावर केवळ शेतकऱ्यांची दिशाभूल करण्यासाठी स्थगिती दिल्याची घोषणा सत्ताधारी करत होते मात्र निवडणूक पूर्ण होऊन सत्तेवर आल्यावर शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनाला सरकार विसरून गेले आहे. नानाप्रकारे राज्यात शेतकऱ्यांना शेती व्यवसायापासून दूर करण्याचे षडयंत्र हे सत्ताधारी करीत आहेत.तालुक्यातील ज्या शेत जमिनीवरून हा महामार्ग प्रस्तावित आहे तेथील शेतकरी एकत्र घेऊन यावर येत्या काळात आंदोलनाची दिशा ठरविण्यात येईल.

**माजलगाव मधून ..**

कानातील तनिष्क प्रती ग्रॅम३०००रुपये प्रमाणे एकुण किं.अं१५०००/-रुपये,तिन

पान १ वरून...

सोन्याचे नथ एक ग्रॅम वजनाचे प्रति ग्रॅम किंमत अं.३००० रुपये प्रमाणे एकुण किं.९०००/-रुपये,चांदिचे चैन व बाजुबंद किंमत ३००० रुपये,एक विवो कंपनीचा मोबाईल मॉडेल नं १९१७ ज्याचा आयएम ईआयनं८६८८६००४७८८४११७,८६८८६००४७८८४१०९ असा असलेला जुना वापरता किंमत अं.२००० रुपये,पासपोर्ट असा एकूण ७४०००/- रुपयाचा माल.तरी दि.२८/०३/२०२५ रोजी रात्री ०१.३० ते ०६.०० वा.चे पूर्वी घरातील लोखंडी कपाटा मध्ये ठेवलेले वरील वर्णनाचे व किंमतीचे सोन्याचे व चांदीचे दागीने, मोबाईल व पासपोर्ट हे कोणीतीर अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून घराची कडी उघडून लोखंडी कपाटाचे लॉक उघडून आत ठेवलेले सोन्या चांदीचे दागीने चोरून घेऊन गेले आहे.अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा रजि.नं.०१२७/२०२५,(भारतीय न्याय संहिता (बीएनएस),२०२३,३३१(४), ३०५(र) गुन्हे दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पी.पी.मुंडे हे करत आहेत.

**महिला आणि..**

पोहताना दिसून आले.

पुढे बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, आपले जीवन अमुल्य आहे, घरी कोणीतरी आपली वाट पाहत आहे. आयुष्य खूप सुंदर असून जग आपल्याला पहावयाचे आहे. त्यामुळे क्षणिक आनंदाच्या मोहापायी आपले जीवन उध्वस्त करून घेवू नका, तुमच्या जाण्याने परिवारातील इतरांना सुध्दा त्रास आणि दुःख होणार आहे. त्यामुळे कालव्यात पोहण्यासाठी उतरू नका. युवकांबरोबरच माय-माऊल्यांना सुध्दा विनंती आहे, अनेक माताभगिनी कपडे धुण्यासाठी कालव्यात उतरत आहेत. कालव्याच्या अस्तरीकरणाची कामे पूर्ण झाल्यामुळे कालव्याचा पृष्ठभाग निसरडा झाला आहे. त्यामुळे

पान १ वरून...

पाय घसरून पाण्याच्या प्रवाहात वाहून जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे काळजी घ्या. कोणीही कालव्याच्या पाण्यात उतरण्याचा प्रयत्न करू नका, आपले जीवन अमुल्य आहे त्याचा आनंद घ्या असे भावनिक आवाहन शेवटी आ.पंडित यांनी केले आहे.

मागील आठवडाभरात कालव्यात पोहण्यासाठी गेलेल्या दोन युवकांचा पाण्यात वाहून गेल्यामुळे मृत्यु झाल्याच्या दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. कालव्यातील पाण्याच्या प्रवाहाचा वेग वाढलेला आहे. त्याचा अंदाज येत नाही त्यामुळे सराईत पोहणाऱ्यांना सुध्दा धोका निर्माण होतो. या दुर्दैवी घटनांमध्ये मृतदेह काढताना सुध्दा अनेक अडचणी समोर आलेल्या आहेत. या पार्श्वभुमीवर आ.विजयसिंह पंडित यांनी केलेल्या आवाहनाला महत्व आहे.

**पवनचक्की कंपन्यांची ..**

दाब विद्युत तारा ओढण्याचे काम सुरू असुन आमच्या सहमतीविना आणि कोणताही मावेजा न देता काम करत असल्याची लेखी तक्रार दि.२० फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक बीड, उपविभागीय अधिकारी बीड आणि तहसीलदार बीड यांना दिली होती.परंतु त्याची दखल घेण्यात आली नाही. आज पोलिस प्रशासन आणि अतिरीक्त फोर्स आणुन तारा ओढण्याचे काम दुपारी सुरू केल्याने आम्ही सगळे कुटुंबातील दावे आणि पेट्रोल बाटल्या घेऊन टावर वर चढलो होतो.पोलिस प्रशासनाने आम्हाला जबरदस्तीने खाली उतरवले आमचे मोबाईल हिसकावून घेतले. उद्या तुम्हाला मावेजा मिळेल असे म्हणत सध्या पोलीस बंदोबस्तात तारा ओढण्याचे काम सुरू आहे. आमचे संपूर्ण कुटुंब आसिब पठाण,आदम पठाण, नासिर पठाण, रज्जाक पठाण,फातिमा पठाण,अख्तरबी पठाण, पप्पू खान,अन्वर पठाण,तोफिक पठाण सगळे कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.



# शिवसेनेचे मुख्यनेते उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब यांचा यवतमाळ आभार दौरा नियोजन बैठक

## मंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत संपन्न

यवतमाळ ।प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते तथा लोकप्रिय उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे साहेब ३ एप्रिल २०२५ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील मतदार राजाचे आभार मानण्यासाठी जिल्हा दौऱ्यावर येत आहे. या दौऱ्याच्या नियोजना संदर्भात जिल्हा शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक आज शासकीय विश्रामगृह येथे पार पडली.

ना. एकनाथ शिंदे साहेबांनी मुख्यमंत्री असताना घेतलेल्या लोकप्रिय निर्णयामुळे या आभार दौऱ्यावेळी युवा, महिला, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत करतील. आभार दौऱ्याचा सविस्तर कार्यक्रम देखील लवकर जाहीर करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.या बैठकीला जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार, जिल्हाप्रमुख श्रीधरकाका मोहोड, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा कालिंदाताई पवार, माजी जिल्हा प्रमुख पराग पिंगळे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख वैशालीताई मासाळ, महिला आघाडी जिल्हा संघटीका माधुरीताई अराठे, युवासेना संपर्कप्रमुख विशाल गणात्रा यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पीएम श्री.मा.शाळा पालीच्या वतीने विद्यार्थ्यांचे आहार व आरोग्य विषयाचे व्याख्यान संपन्न



बीड ।प्रतिनिधी

दि.२८ मार्च २०२५ शुक्रवार रोजी बालगंधर्व सभागृहात व्याख्यान मौजे पीएम श्री.मा.शाळा पाली यांच्या वतीने विद्यार्थ्यांचे आहार व आरोग्य या विषयाचे व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री.लाड सर हे होते तर प्रमुख वक्त्या म्हणून महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य श्रीमती डॉ.संध्या आयस्कर या लाभल्या होत्या

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्राचार्य श्रीमती डॉ.संध्या आयस्कर यांनी शिशुवर्गापासून ते किशोरवयीन विद्यार्थ्यां पर्यंतआहार व आरोग्य याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती काब्दे एस. व्ही. यांनी केले तसेच सूत्रसंचलन श्री राठोड सर व आभार प्रदर्शन श्री तळेकर सरांनी केले कार्यक्रमाला विद्यार्थी शिक्षकांसह शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



# जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दर्गा शरीफ शाळेचे घवघवीत यश

जालना ।प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दर्गा शरीफच्या सय्यद इम्रा नुरोद्दीन,सय्यद महेक नाजेर, सय्यद तुबा मुदस्सर या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत शानदार यश संपादन केले असून ६ ते ८ या गटात ९० गुण मिळवत त्यांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक फटकविला असून या यशस्वी कामगिरीसाठी मुख्याध्यापक इमरान खान इनायत खान, सहशिक्षिका फिरदौस फातेमा सय्यद परवीन आणि पदवीधर शिक्षक मोहम्मद आवेज़ इमरान सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या अभिमानास्पद विजयाबद्दल संपूर्ण शाळेत आनंदाचे वातावरण असून विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षक वृंदांचे सर्वत्र कौतुक होत आहे

# मनरेगाच्या कुशल देयकांसाठी ४३ कोटी मंजुर

## उर्वरीत निधीसाठी सरपंच-उपसरपंच संघटना पाठ पुरावा करणार - कुंडलिक खांडे

खांडेंनी मानले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार

बीड ।प्रतिनिधी

मनरेगा योजनेंतर्गत बीड जिल्ह्यातील सन २०२१ ते २०२५ पर्यंतच्या एकूण ९८४ ग्राम पंचायत मधील वैयक्तीक व सार्वजनिक कुशल देयक थकित होते. कुशल देयके देण्याची मागणी सरपंच -उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे केली होती. श्री.खांडे यांच्या मागणीला यश आले असून कुशल देयकांसाठी शासनाने ४३ कोटी ४८ लाख ४२ हजार रु.मंजुर केले आहेत. उर्वरीत देयके मिळावीत यासाठी सरपंच उपसरपंच संघटना कायम पाठपुरवा करणार असल्याचे संघटनेचे संस्थापक कुंडलिक खांडे यांनी म्हटले आहे. उपमुख्यमंत्री शिंदे साहेब आणि रोहयो मंत्री भरतसेठ गोगावले यांनी आमच्या मागणीला न्याय दिला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो असेही खांडे यांनी म्हटले आहे.

मनरेगा व आणि राज्य रोहयो या योजनांसाठी पुरक कुशल अनुदान उपलब्ध झाले असून सन २०२४-२५ या वर्षाच्या अर्थ संकल्पीय तरतुदीमधून वित्त विभागाने रोहयो विभागास १०० कोटी रु.इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे. सदर निधीचे जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालयास निधी वर्ग करण्यात आला आहे. शासन परिपत्रक मग्रारो -२०२३ /प्र.क्र.५०/रोहयो - ६ अ दि.२० मार्च रोजी प्रसिध्द झाले असून राज्यातील ८ जिल्ह्यांसाठी १०० कोटी रु.निधी वर्ग करण्यात आला आहे. यामध्ये बीड जिल्ह्यासाठी ४३ कोटी ४८ लाख ४२ हजार रु., जालना जिल्ह्यासाठी १८ कोटी ३३ लाख, अकोल जिल्ह्यासाठी ८५ लाख, भंडारा जिल्ह्यासाठी १३ कोटी २४ लाख, अमरावतीसाठी १५ कोटी २ लाख, लातूरसाठी ३ कोटी ७६ लक्ष,वर्धा जिल्ह्यासाठी ३ कोटी ५२ लक्ष, कोल्हापुर जिल्ह्यासाठी १७ कोटी ६ लक्ष रु. प्राप्त झाला आहे.



बीड जिल्ह्यातील सन २०२१ ते २०२५ पर्यंतच्या एकूण ९८४ ग्राम पंचायत मधील वैयक्तीक व सार्वजनिक कुशल देयक थकित होती. या ग्रामीण पातळीवरील प्रश्नासाठी सरपंच-उपरसपंच संघटनेचे संस्थापक कुंडिलक खांडे यांनी पुढाकार घेत सदरील कुशलची थकित देयके देण्यात यावीत. जेणे करुन ग्रामीण भागातील नागरिकांना याचा लाभ होईल. या संदर्भात दि.६ मार्च रोजी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांची भेटे घेवून निवेदन दिले होते.. श्री.खांडे यांच्या मागणीला यश आले असून कुशल देयकांसाठी शासनाने ४३ कोटी ४८ लाख ४२ हजार रु.मंजुर केले आहेत. उर्वरीत देयके मिळावीत यासाठी सरपंच उपसरपंच संघटना कायम पाठपुरवा करणार असल्याचे संघटनेचे संस्थापक कुंडलिक खांडे यांनी म्हटले आहे.उपमुख्यमंत्री शिंदे साहेब व रोहयो मंत्री गोगावले साहेबांचे विशेष आभार- कुंडलिक खांडे

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांना ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध योजनांची अंमलबजावणी प्रशासकिय पातळीवरुन योग्य रितीने व्हावी यासाठी प्रयत्न केलेले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब व रोहयो मंत्री भरत सेठ गोगावले यांनी सरपंच -उपसरपंच संघटनेच्या मागणीला न्याय दिल्याबद्दल मी त्यांचे संघटनेच्या वतीने जाहिर आभार मानतो असे कुंडलिक खांडे यांनी म्हटले आहे.

दिवाणी न्यायालय, घनसावंगी येथील
श्रीमती एल. एन. पांचाल सह दिवाणी न्यायाधीश व प्र.वर्ग न्यायदंडाधिकारी घनसावंगी यांचे न्यायालयात.
किरकोळ दिवाणी अर्ज क्रं. ५६/२०२५
अफसरबी - वि. - निरंक
नि.क. ५

अर्जदार : १. अफसरबी हामीद शेख, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम,
२. जावेद हामीद शेख, वय ४० वर्षे, धंदा शेती,
३. असलम हामीद शेख, वय ३८ वर्षे, धंदा झेरॉक्स दुकान,
४. नसीम हामीद शेख, वय ३६ वर्षे, धंदा शेती,
५. हारुन हामीद शेख, वय २८ वर्षे, धंदा शेती,
६. नुजहत हामीद शेख, वय २६ वर्षे, धंदा घरकाम,
सर्व रा. पिरगैबवाडी, ता. घनसावंगी, जि. जालना.
विरुद
गैरअर्जदारः निरंक
जाहीर प्रगटन

कलम ३, व ७ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.

अर्जदार यांनी ॲड. टी. एस. गव्हाणे यांच्या मार्फत या न्यायालयात असा अर्ज केला की, अर्जदार यांचे वडील मयत नामे हामीद महेबुब शेख यांचे दिनांक ०४.१२.२०२३ रोजी मयत झालेले आहेत.

हे की, मयत मयत हामीद महेबुब शेख यांना अर्जदारांशिवाय ईतर अन्य कुठलेही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी मयताचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्राची नितांत आवश्यकता आहे.

करीता, या जाहीर प्रगटनाद्वारे सर्वत्र कळविण्यात येते की, या बाबत जर कोणास काहीएक आक्षेप असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात आपला आक्षेप सादर करावा. जर नमूद केलेल्या काळात कोणाचाही आक्षेप आला नाही, तर संबंधित प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल, याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख २३.०४.२०२५ ठेवण्यात आली आहे.

आज दिनांक २६.०३.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक

स्वाक्षरित/-
आदेशावरून
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,घनसावंगी



# बदामराव पंडित यांच्या इफ्तार पार्टीला हिंदू व मुस्लिम बांधवांची अभूतपूर्व उपस्थिती

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई येथे मुस्लिम समाज बांधवांच्या रमजान या पवित्र उपवासाच्या महिन्यानिमित्त शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वतीने दिनांक २८ मार्च २०२५ रोजी आयोजित केलेल्या रोजा इफ्तार पार्टीमध्ये अभूतपूर्व संख्येने उपस्थित राहिलेल्या हिंदू - मुस्लिम बांधवांचे सामाजिक ऐक्य पुन्हा एकदा पाहायला मिळाले.


गेवराई शहरातील नगर परिषद सांस्कृतिक सभागृह येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वतीने रमजान या पवित्र महिन्यानिमित्त मुस्लिम बांधवांसाठी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २८ मार्च २०२५ रोजी सायंकाळी झालेल्या या इफ्तार पार्टीमध्ये माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती युधाजीत पंडित, युवानेते रोहित पंडित, युवानेते यशराज पंडित यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या इफ्तार पार्टीस जानमोहम्मद बागवान, एस वाय अन्सारी, आयुब बागवान, सहाल चाऊस, माणिक शेठ बागवान, शेख जमील शेठ, शेख सरफराज, रऊफ शेठ हरबट, शेख सिराज, शौकतभाई सौदागर, शेख शेहदाद, इमरान अन्सारी, अमर टेलर, बबलू खराडे, सय्यद सिराज, फैसल चाऊस, इजरायल कुरेशी, जैनुद्दीन कुरेशी, समीर कुरेशी, नदीम कुरेशी, तौफिक कुरेशी, सत्तार भाई कुरेशी, शफीभाई अत्तार, शेख सुभान, शेख नवीद, हारून तांबोळी, वाजेदभाई चौधरी, शेख हकीम, शेख खय्युम, राजू पठाण, एजाज पठाण, शेख अवेज, रहीम पटेल, शेख आफ्रिदी मुकुभाई, शेख हबीबभाई, शेख इमरानभाई, सय्यद मुदतशीर, शेख खाजाभाई, तय्यब बागवान, शफिक डांगे, एजाज पठाण, सय्यद सलमान, सुभाष घाडगे, धर्मराज आहेर, भाऊसाहेब माखले, मिलिंद वाघमारे, हरेश सेठ मंघारमानी, सुभाषराव टोणपे, प्रकाश दावणगिरे, कैलास राठोड, कैलास मोरे, शांताराम बांगर, सोनाजी भुजंगे, बंडू कानगुडे आदींसह हिंदू- मुस्लिम समाज बांधव प्रचंड संख्येने उपस्थित होते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी उपस्थित यांचे आभार व्यक्त केले.

# माजलगाव येथे सैलानी बाबा संदल, यात्रा उरूसचे आयोजन

## सैलानी बाबा दर्गा : हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक

प्रतिनिधी । माजलगाव

शहराजवळील असलेल्या ढोरगाव-हिंगणवाडी शिवारात सैलानी बाबा यांचे दर्गा परिसर येथे दिनांक ०२ एप्रिल वार बुधवार रोजी सैलानी बाबा संदल व उरूसचे आयोजन करण्यात आले आहे. याचा लाभ भक्तांनी घ्यावा असे आवाहन यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष विशाल गायकवाड यांनी केले आहे.या दर्ग्याच्या दर्शनासाठी जिल्हा व राज्यभरातून विविध जाती धर्मातील भाविकांची मोठी उपस्थिती दरवर्षी असते. सकाळी ०९ ते सायंकाळी १० वाजेपर्यंत भाविक भक्तांचि दर्शनासाठी आलोट गर्दी पाहायला मिळते. व तसेच महाप्रसादाचा कार्यक्रम सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५ वाजेपर्यंत राहील. ढोरगाव हिंगणवाडी शिवारात असलेल्या सैलानी बाबा यांच्या दर्यात दरवर्षी पाडव्या नंतर तीन-दिवसांनी संदल चे आयोजन करण्यात येते मागील अनेक वर्षापासून ही परंपरा सुरू आहे. मा. बाबुदादा राजेभाऊ गायकवाड पुजारी मोगरेकर फरशी कारखान्याजवळ, देवखेडा नांदुर, माजलगांव जि.बीड यांच्या घरून दि.०२ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी संदल बायपासने निघुन आंबेडकर चौकातून त्याच दिवशी रात्रौ ९.३० वाजता सैलानी बाबांच्या



दर्गा येथे पोहचते. यूसुफ कादरी, आगा खाँन साहाब, शेख महेबुब, रईस बाबा कादरी, शेख मुस्तकीम बाबा, सय्यद रफीक कादरी, पुजारी परिवाराच्या व ईतर मान्यवरांच्या हस्ते सैलानी बाबा दर्गाह येथे यावर्षी चादर चढविण्यात येणार आहे व तसेच चादर चढवल्या नंतर सुप्रसिद्ध कव्वाल समीर ताज ( छत्रपती संभाजीनगर) यांचा शानदार कव्वाली चा कार्यक्रम होईल तसेच संदल निमित्त्य दर्शनास सर्व जनतेने यावे असे आवाहन सैलानी बाबा यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष विशाल बाबा गायकवाड यांनी केले आहे.

जाहिर प्रगटन

माझे पक्षकार Jana Small Finance Bank Limited बानी दिलेल्या माहिती व अधिकारावरून खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देण्यात येते कि, Muktabai Narayan Waghmode यांच्या मालकी व ताब्यातील त्याचा प्लॉट, सदरील प्लॉटचे वर्णन खालील प्रमाणे :-

Grampanchayat Property No. 53, situated at Pandhurani, Tq. Mukhed, Dist. Nanded. Sale Deed bearing Regd. No.650/2025, Dt. 20/6/2025, executed by Pravin Sio. Ganaptrao Shrirame in favour of Muktabai Narayan Waghmode. आधारे खरेदी केली आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सूचीत करण्यात येते कि, Muktabai Narayan Waghmode यांनी नमूद वर्णन असलेली मालमत्ता Jana Small Finance Bank Limited यांचेकडे कर्व घेऊन गहाण ठेवत आहेत सदर व्यवहारबद्दल कुणाचाही, कुठल्याही प्रकारचा आक्षेप वा उबर अथवा काहीही हक्कसंबंध असेल तर सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसाच्या आत आपला उकर वा आक्षेप योग्य त्या कागदपत्र व पुराव्यासह सदरील पत्त्यावर नोंदवावा.

# सोमवारी ७ एप्रिल रोजी भ्रष्टाचार निर्मुलन समिती बैठक

बीड ।प्रतिनिधी

जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती बीड तथा जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि. ७ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी १०. ३० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्हयातील शासकीय कर्मचा-याविरुध्द प्राप्त होणा-या तक्रारींबाबत पाठपुरावा करण्यासाठी जिल्हास्तरीय भ्रष्टाचार समिती स्थापन करण्यात आली असून त्याअनुषंगाने नागरिकांनी शासकीय अधिकारी, कर्मचा-याविरुध्द भ्रष्टाचारासंबधी तक्रार असल्यास जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीसमोर व्यक्तीशः उपस्थित राहून लेखी स्वरुपात मांडाव्यात सदर तक्रारीसोबत पुरावे जोडले गेले नसल्यास अशा तक्रारी घेतल्या जाणार नाहीत,

जाहीर प्रगटन

मा. श्री. के. एन. निवडंगे ४थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, केज यांच्या न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १२८ / २०२५
मारुती वि निरंक नि. सी
अर्जदार १. मारुती लक्ष्मण जधव वय ६८ वर्षे, धंदा शेती
रा. पाटील गल्ली, केज ता. केज जि. बीड ह. मु. बाहेगव्हाण ता. वडवणी जि. बीड
निरंक

प्रकरण :- भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार हे मयत नामे लक्ष्मण धोंडीबा जाधव यांचा मुलगा आहे. मयत नामे लक्ष्मण घोडीबा जाधव हे दि. ०९.१२.१९८५ रोजी वयोवृध्द होवुन नैसर्गीकरित्या मयत झाले आहेत. तसेच जनाबाई लक्ष्मण जाधव हया केज ता. केज जि. बीड येथील रहिवाशी असुन त्या वयोवृध्द होवुन नैसर्गीकरित्या दि. २५.०२.२०२५ रोजी मयत झाल्या आहेत. यांना अर्जदार हेच एकमेव वारस असुन अर्जदाराशिवाय मयतास इतर कोणीही जवळचे कायदेशीर वारस नाहीत अर्जदार हेच एकमेव वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी, वरील अर्जदार हे मयत नामे लक्ष्मण धोंडीबा जाधव व मयत नामे जनाबाई लक्ष्मण जाधव रा. पाटील गल्ली केज ता. केज जि. बीड ह. मु बाहेगव्हण ता. वडवणी जि. बीड यांचे वारस आहेत. शासकिय व निमशासकिय कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत नामे लक्ष्मण धोंडीबा जाधव व मयत नामे जनाबाई लक्ष्मण जाधव रा. पाटील गल्ली केज ता. केज जि. बीड ह. मु. बाहेगव्हाण ता. वडवणी जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २६/०३/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २८/०४/२०२५ आहे.

कनिष्ठ लिपीक
४ सह दिवाणी
न्यायालय,
क. स्तर, केज

स्वाक्षरित/-
सहा.अधीक्षक
दिवाणी न्यायालय,
क.स्तर, केज

जाहीर प्रगटन
मा. श्रीमती डी. के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज ५०२/२०२५
कल्पना विरुध्द निरंक
ॲड. काळे जी.व्ही.

अर्जदार :- १) कल्पना भ्र. सुदाम वाघमारे वय: ४२ वर्षे, धंदा घरकाम
२) सुदाम पि. एकनाथ वाघमारे वय: २४ वर्षे, धंदा: शिक्षण
३) ओमकार पि.सुदाम वाघमारे वय: २२ वर्षे, धंदा शिक्षण
४ प्रियंका भ्र. मनोज वाळके वय २१ वर्षे धंदा घरकाम
५. भगिरथी भ्र. एकनाथ वाघमारे वय ७२ वर्षे धंदा घरकाम सर्व रा. चाकरवाडी ता.जि.बीड
विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत...

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे सुदाम पि. एकनाथ वाघमारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे सुदाम पि. एकनाथ वाघमारे रा. चाकरवाडी ता.जि.बीड यांचा मृत्यु दिनांक : २१.०४.२०२४ रोजी शासकीय रूग्णालय, आष्टी ता. आष्टी.जि.बीड येथे अपघाती मृत्यु झाला. अर्जदार क्र १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क २ व ३ ही मयताची मुले आहेत. अर्जदार क ४ ही मयताची विवाहीत मुलगी असून अर्जदार क ५ ही मयताची आई आहे. मयतास सदर अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत सुदाम पि. एकनाथ वाघमारे रा. चाकरवाडी ता.जि.बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २०/०३/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक २९/०४/२०२५.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक

स्वाक्षरित/-
आदेशावरून
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

# संचालक दयानंद कांबळे आणि संशोधन अधिकारी मयुरा देशपांडे यांना सेवानिवृत्तीनिमित्त शुभेच्छा

मुंबई ।प्रतिनिधी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील संचालक (माहिती)(वृत्त व जनसंपर्क) दयानंद कांबळे आणि संशोधन अधिकारी मयुरा देशपांडे-पाटोदकर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांच्या हस्ते आज शुभेच्छा देण्यात आल्या. महासंचालक श्री. सिंह यांनी या दोन्ही अधिकाऱ्यांना भावी वाटचालीसाठी व आरोग्यदायी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.



माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) दयानंद कांबळे आणि संशोधन अधिकारी मयुरा देशपांडे-पाटोदकर हे सेवानिवृत्त झाले. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमास सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, संचालक (माहिती-प्रशासन) हेमराज बागुल, संचालक (माहिती) किशोर गांगुर्डे, संचालक (माहिती) डॉ.गणेश मुळे तसेच महासंचालनालयातील वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी श्री. कांबळे आणि श्रीमती देशपांडे - पाटोदकर यांनी त्यांच्या सेवा कालावधीत महासंचालनालयाच्या कामकाजात भरीव योगदान दिले आणि अनेक विविध व नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले, अशा शब्दात त्यांचा गौरव केला.संचालक (माहिती-प्रशासन) हेमराज बागुल म्हणाले की, श्री.कांबळे यांनी महासंचालनालयाच्या कामकाजात नवतंत्रज्ञानाचा वापर करून सुधारणा केली आणि कार्यप्रणालीत नाविन्यता आणली. त्याचा लाभ महासंचालनालयाच्या कामकाजात झाला.संचालक (माहिती) डॉ.गणेश मुळे यांनी दयानंद कांबळे आणि मयुरा देशपांडे - पाटोदकर यांचे महासंचालनालयातील कामकाजातील सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी अवर सचिव अजय भोसले, उपसंचालक (प्रशासन) गोविंद अहंकारी यांनी देखील मनोगत व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या.यावेळी संचालक (माहिती)(वृत्त व जनसंपर्क) दयानंद कांबळे आणि संशोधन अधिकारी मयुरा देशपांडे-पाटोदकर यांनी सत्कार स्वीकारुन महासंचालनालयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन सर्वांचे आभार मानले.

# भुजल पातळी खालावली, पाणी प्रश्न गंभीर होण्याआगोदर उपाय योजना करा

## उल्हास गिराम यांचे तहसीलदारांना निवेदन

बीड ।प्रतिनिधी

या वर्षी पाऊसकाळ अल्प प्रमाणात झाल्यामुळे भुजल पातळी मार्च मार्च महिन्यातच खालावली असुन, ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याबरोबर पशुधन वाचवण्यासाठी वेळीच उपाय योजना करावी, या संदर्भात बीड चे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली.

ग्रामीण भागात पाणी प्रश्न डोके वर काढु लागला आहे. ज्या तलावात आज ही उपलब्ध पाणी साठा बरा आहे, अशी तलावे पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित करावीत, आवश्यक तिथे नियमित पाणीपुरवठा करावा, आवश्यक तिथे पाणी टँकर पुरवावेत, फार्मर आयडी साठी मुदतवाड




मिळावी या मागणीचे निवेदन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे नूतन जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी बीड च्या तहसील कार्यालयास भेट दिली, तहसीलदार उपलब्ध नसल्याने नायब तहसीलदार सुहास हजारे साहेब यांना निवेदन देऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांच्या समवेत शिवसेना जिल्हा समन्वयक संजय भाई महाद्वार, जिल्हा सहसंघटक रतन गुजर, उपजिल्हाप्रमुख राजु महुवाले, बीड विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे, सरपंच प्रदीप कोठुळे, बंटी परदेशी, दिलीप पवार, बाळू वैद्य, व आदी पदाधिकारी उपस्थित होते.




# प्रिन्सिपल राकेश पवार यांचा पत्रकारांच्या वतीने सत्कार

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर शहरातील आयडियल इंग्लिश स्कूलचे प्रिन्सिपल राकेश पवार यांना बेस्ट प्रिन्सीपल पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल शिरूर पत्रकारांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.मुंबई येथे पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या कार्यक्रमात राकेश पवार यांचा पहिल्या महिला सनदी अधिकारी किरण बेदी आणि राष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू पद्मविभूषण सायना नेहवाल यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला होता.त्यांच्या या सन्मानामुळे शिरूर तालुक्याची शैक्षणिक क्षेत्रात उंची वाढल्यामुळे पत्रकार बांधवांच्या वतीने शाल,श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.या वेळी ज्येष्ठ पत्रकार गोकुळ पवार,भारत पानसंबळ, प्रमोद निकम आणि सर्पमित्र महेश औसरमल यांची उपस्थिती होती.



बीड - गेल्या दोन वर्ष्या पासून लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाने सर्वाधिक कार्यवाह्य ज्यांच्या काळात झाल्या ते विभागाचे पोलीस अधीक्षक श्री संदीप आटोळे यांना रोटरी क्लब बीड यांच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला.

# आयान पठाणचा पहिला रोजा

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर शहरापासून जवळच असलेल्या उत्तमनगर येथील आयान बाबा पठाण या तिसरीच्या वर्गातील विद्यार्थ्याने आपला पहिला रोजा पूर्ण केला आहे.मुस्लिम धर्मियांचा पवित्र महिना समजल्या जाणाऱ्या रमजान मध्ये मोठ्या व्यक्तींसोबत लहान मुले देखील रोजा करत असतात.पहाटे लवकर उठून इस्लाम धर्माच्या परंपरेनुसार सर्व विधी पार पाडून हा रोजा ठेवला जातो.दिवसभर अन्नाचा कण न खाता निरंकार पद्धतीने रोजा ठेवण्यात येतो.सध्या उन्हाळ्याचे कडक दिवस असतानाही मुस्लिम समाजातील लहान मुलांनी धरलेले रोजे कौतुकाचा विषय ठरत आहेत.आयान पठाण हा सेवानिवृत पोस्टमन याकूबभाई शेख यांचा नातू तर फारुक अताउल शेख यांचा भाचा आहे.त्याने आपल्या जीवनातील पहिला रोजा पूर्ण केल्याबद्दल त्याचे नातेवाईकातून कौतुक होत आहे.



# २९,३० व ३१ मार्च या सुट्टीच्या दिवशीही सुरू राहणार वीजबील भरणा केंद्रे

## वीजपुरवठा खंडीत होवू नये यासाठी वीजग्राहकांनी त्वरीत वीज बील भरावे, महावितरणचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी

महावितरण समोरील सध्याच्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर आणि थकबाकी वसुलीची गंभीर गरज लक्षात घेता, २९, ३० आणि ३१ मार्च २०२५ या सुट्ट्यांच्या काळातही महावितरणची सर्व वीजबील भरणा केंद्र कार्यरत ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याचा थकीत वीजबील असलेल्या ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा असे अवाहन महावितरणने केले आहे.

आर्थिक वर्ष संपत असताना, महसूल संकलन जास्तीत जास्त करण्यासाठी आणि कंपनीची आर्थिक स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी सुटटीच्या दिवशीही थकीत वीजबील जमा होणे महत्त्वाचे आहेत. थकबाकी वसूल करण्याचे महत्त्व लक्षात घेता, सर्व संबंधित कार्यालयांना २९,३० आणि ३१ मार्च या तारखांना सर्व वीजबील भरणा केंद्र सुरू ठेवण्यासाठी आवश्यक सूचना जारी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचबरोबर महावितरणचे मोबाईल प, मोबाईल वॉलेट तसेच ऑनलाईन असणाऱ्या विविध पर्यायांचा वापर करत वीज ग्राहकांनी आपल्या थकीत व चालू वीज बिलाचा भरणा करून महावितरणला सहकार्य करावे तसेच उन्हाळ्याच्या काळात वीजपुरवठा खंडीत होवू नये यासाठी त्वरीत वीजबील भरावे असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे.

# व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांकडील थकबाकी शुन्य करा सहव्यवस्थापकीय संचालक राहूल गुप्ता यांचे निर्देश

बीड ।प्रतिनिधी

अखंडीत वीजसेवेसाठी थकबाकीसह वीजबिलांची नियमीत वसुली होणे गरजेचे असून त्यासाठी वीजबील वसुलीची कार्यक्षमता वाढवून प्राधान्याने व्यावसायिक व औद्योगिक वीजग्राहकांची थकबाकी शुन्य करा, अन्यथा वीजपुरवठा खडीत करण्याची कारवाई करा असे निर्देश महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक राहूल गुप्ता यांनी दिले.

बीड येथे मंडल कार्यालयात बुधवारी (दि.२६ मार्च) अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत, सर्व कार्यकारी अभियंते यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत बीड मंडळातील मार्च अखेरच्या पार्श्वभुमीवर वीजबीलाच्या थकबाकी व चालू देयकाच्या वसुली बाबत आढावा घेत श्री गुप्ता म्हणाले की, कंपनीच्या आर्थिक स्थैर्यासाठी शंभर टक्के वीजबील वसूल होणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे चालू वीजबीलासह संपूर्ण थकबाकीही वसूल होणे गरजेचे आहे. यासाठी प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कार्यक्षमता वाढवत मागील थकबाकीसह चालू महिन्याचे वीजबील शंभर टक्के वसूल करण्याचे निर्देश दिले. व्यावसायिक व औद्योगिक वर्गवारीतील एकही ग्राहक थकबाकीमध्ये राहणार नाही याची दक्षता घ्यावी. जे ग्राहक वारंवार सुचना देवूनही वीजबील भरण्यास टाळाटाळ करीत असतील तर अशा ग्राहकांचा तात्काळ वीजपुरवठा खंडीत करावा. श्री गुप्ता पुढे म्हणाले की, माहे एप्रिल २०२५ पासून बीड मंडळ कार्यालया अंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचा कृती आराखडा तयार करून त्याप्रमाणे काम करण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या. ग्रामीण व शहरी भागातील वीज चोरी शोध मोहीम सातत्याने राबविण्यात यावी. प्रत्येक गावामध्ये विज बिल दुरुस्ती शिबिरे आयोजीत करून वीजग्राहकांच्या तक्रारींचे तात्काळ निरसन करण्यात यावे.



तसेच येणाऱ्या काळातील उन्हाची तीव्रता लक्षात घेवून शहरी भागासोबतच ग्रामीण भागातील वीजपुरवठा अखंडीत रहावा यासाठी वीज वाहिनी व विद्युत रोहित्र यांच्या देखभाल व दुरुस्तीचे काम वेळेत पुर्ण करण्याच्या सुचनाही सहव्यवस्थापकीय संचालक राहूल गुप्ता यांनी दिल्या. सदरील आढावा बैठकीस अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत यांच्यासह बीड मंडळातील कार्यकारी अभियंता (प्र), कार्यकारी अभियंता बीड विभाग, अतिरिक्त कार्यकारी अभियंता बीड शहर, उपकार्यकारी अभियंता बीड ग्रामीण तसेच उपविभागीय कार्यालयातील शाखा अभियंता प्रामुख्याने उपस्थित होते. फोटो ओळ: बीड मंडळातील वीजबील वसुलीचा आढावा घेताना सहव्यवस्थापकीय संचालक राहूल गुप्ता सोबत अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत आंबाजोगाई विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता संदीप चाटे

# सावता परिषदेच्या प्रधान महासचिव पदी डॉ.राजीव काळे यांची निवड

बीड (प्रतिनिधी)

प्रत्येक तीन वर्षाला फेररचना करण्याच्या सावता परिषदेच्या संघटनात्मक धोरणाला अनुसरुन संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांच्या मार्गदर्शनानूसार व सावता परिषदेचे महाराष्ट्र प्रभारी मयुर वैद्य तसेच प्रदेश कार्याध्यक्ष श्री.संतोष राजगुरु व. पांडूग कोठाळे, युवा प्रदेशाध्यक्ष इंजि. प्रविण गाडेकर यांच्या सहकार्याने पुढील तीन वर्षांसाठी प्रदेशाध्यक्ष या नात्याने गणेश दळवी यांनी प्रदेश कार्यकारणी जाहिर केली. यामध्ये प्रधान महासचिव पदी डॉ.राजीव आबाराव काळे यांची निवड करण्यात आली आहे.



बीड तालुक्यातील नाळवंडी या गावचे रहिवासी असलेले डॉ. राजीव आबाराव काळे सावता परिषदेसोबत २००८ पासुन एकनिष्ठ पदाधिकारी आहेत.आपल्याअमोघ वक्तृत्वातून त्यांनी सावता परिषदेच्या कार्याला बळकटी दिली आहे. कल्याणराव आखाडे यांचे अत्यंत प्रामाणिक व विश्वासू कार्यकर्ता अशी त्यांची ओळख आहे. ग्रामीण भागातील या तरूणाला राज्यात काम करण्याची संधी कल्याणराव आखाडे या नेतृत्वामुळे प्राप्त झाली. सावता परिषद ही समाजमान्य संघटना आहे. सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांनी माळी समाजाच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी उभा केलेला हा विचारमंच आहे. आज राज्याच्या सत्तावीस जिल्ह्यांमध्ये सावता परिषद कार्यरत आहे. माळी समाजातील सर्वात मोठी संघटना म्हणून सावता परिषदेचे नाव राजकीय पटलावर आहे. कल्याणराव आखाडे यांच्यासारख्या सामान्य कुटुंबातील एका तरुणाने उभा केलेले हे संघटन आहे. राजकीय इतिहास भूगोलाची पार्श्वभूमी नसताना स्वतःच्या हिमतीवर हे संघटन कार्य निर्माण करण्याचे धाडस आखाडे यांनी दाखवले आहे. आखाडे यांच्यामुळे आज राज्यातील असंख्य तरुण सावता परिषदेच्या माध्यमातून संघटित झालेले आहेत आणि या संघटनेच्या माध्यमातून माळी समाजाच्या अनेक प्रश्नांना न्याय मिळालेला आहे. श्रीक्षेत्र अरण या तीर्थक्षेत्राचा प्रश्न तडीस लावण्यामध्ये सावता परिषदेचे फार मोठे योगदान आहे. आज राज्याच्या कानाकोपऱ्यात सावता परिषद विस्तारत आहे. या राज्यव्यापी संघटनेचे प्रधान महासचिव म्हणून डॉ.राजीव आबाराव काळे यांची निवड म्हणजे ग्रामीण भागातील तरुणाला दिलेली फार मोठी संधी आहे. डॉ. राजीव काळे हे सातत्याने सावता परिषदेच्या संघटन कार्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आलेले आहेत. त्यांची संघटनेप्रती असलेली निष्ठा व कल्याणराव आखाडे यांच्याप्रती असलेला विश्वास यामुळे त्यांच्या खांद्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी देण्यात आली आहे त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक अभिनंदन होत आहे.

# शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेमध्ये बारसवाडा शाळेतील शिक्षकांचे यश

अंबड- महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे आयोजित शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा २०२३ आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारसवाडा केंद्र डोणगाव तालुका अंबड जिल्हा जालना येथील शिक्षकांनी यश संपादन केले.

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालना,शिक्षण विभाग जिल्हा परिषद जालना आयोजित करण्यात आलेल्या बक्षीस वितरण कार्यक्रम प्रसंगी (दि.२७) मंचावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालना प्राचार्य डॉ.राजेंद्र कांबळे, उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद जालना शाम देशमुख,सुभाष भालेराव आयटी विभाग प्रमुख डॉ.संजय येवते, डॉ .राजेश सरकटे तसेच डॉ.प्रमोद कुमावत,डॉ.श्रीहरी दराडे,प्रा.सय्यद अख्तर,प्रा.योगेश्वर जाधव,अंबड तालुका संपर्क प्रमुख प्रा.निलोफर पटेल,प्रा.प्रेरणा मोरे,अंबड तालुका गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण तसेच व्हिडीओ निर्मिती तालुका समन्वयक सतिश म्हेत्रे यांची उपस्थिती होती.

या स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारसवाडा येथील उपक्रमशील शिक्षक श्रीधर यशवंतराव कुलकर्णी यांनी इयत्ता सहावी ते आठवी गटात मराठी विषयावर आधारित तयार केलेल्या शैक्षणिक व्हिडिओसाठी जिल्हा स्तरावर द्वितीय पारितोषिक मिळाले.सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र व नऊ हजार रूपये असे पुरस्काराचे स्वरूप असून या व्हिडिओसाठी अंबड तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला.तालुका स्तरावर तीन हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्हे देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.




बारसवाडा जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक गोकुळ महादेव बोबलट यांनी तयार केलेल्या शैक्षणिक व्हिडिओसाठी जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला.दोन्ही पुरस्कार पटकाविलेल्या या व्हिडिओसाठी तेरा हजार रूपये, सन्मानचिन्हे व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

दोन्ही शिक्षकांनी मिळविलेल्या या यशाबद्दल त्यांचे शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ,शिक्षण विस्तार अधिकारी दिनेश शिनगारे,डोणगावचे केंद्रप्रमुख रामेश्वर आंबटकर,साधन व्यक्ती सतीश म्हेत्रे,केंद्रीय मुख्याध्यापक बंडू बांगर,बारसवाडा शाळेचे मुख्याध्यापक कैलास जाधव,कोळी सिरसगाव शाळेचे मुख्याध्यापक सुभाष वाघमारे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष राधाकिसन सावंत,उपाध्यक्ष आबासाहेब शिंदे,सरपंच रामेश्वर खंडागळे,संतोष सावंत,अर्जुन खोंडे,लहू गोल्हार,आकाश गडवे, सुरेखा जाधव, संतोष पालवे,ग्रामस्थ,पालक डोणगाव केंद्रांतर्गत शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अ‍ॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# हिवरा गोवर्धन येथील प्रगतिशील शेतकऱ्याने केली सेंद्रिय पद्धतीने करडईची लागवड

## भेसळयुक्त तेलापासुन बचावासाठी युवक शेतकरी भागवतराव निर्मळ पाटील यांचा वेगळा उपक्रम

परळी (प्रतिनिधी)

जगभरामधे दिवसेंदिवस आधुनिकतेचे वारे वाहायला लागलेले असल्यामुळे,ग्रामीण भागात शेतकरीही रासायनिक खते व बी-बियाणे वापरून उत्पादन वाढीच्या दिशेने वाटचाल करताना पाहायला मिळतात परंतु,यामुळे भेसळयुक्त अन्नपदार्थ व तेलाचे सर्वत्र उत्पादन आणि विक्री होत असते.भेसळयुक्त तेलाच्या सेवनामुळे आपल्याला अनेक आजारांना सामोरे जावे लागते.या आजारांपासून बचाव करण्याच्या उद्देशानेच आणि भेसळविरहित तेल आपल्या दैनंदिन आहारामध्ये वापरावयास मिळण्यासाठी हिवरा गोवर्धन गावातील प्रगतीशिल युवक शेतकरी भागवतराव निर्मळ पाटील यांनी त्यांच्या दहा एक्कर शेतीमध्ये सेंद्रिय पद्धतीने करडई पिकाची लागवड/पेरणी केलेली आहे.सद्या त्यांच्या शेतातील करडईचे पीक काढणीला आलेले आहे.सुरुवातीला २०२४ साली भागवतराव निर्मळ पाटील यांनी त्यांच्या तीन एक्कर शेतीमध्ये सेंद्रिय पद्धतीने करडई पिकाचे उत्पादन घेण्याचा पहिला प्रयोग केला.त्यावेळेस केलेल्या पहिल्या सेंद्रिय पद्धतिच्या करडई पिकाचा फायदा त्यांना जाणवला त्यामुळे भागवतराव निर्मळ पाटील मागच्या दोन वर्षांपासून सेंद्रिय पद्धतीने करडई पिकाचे उत्पादन घेत आलेले आहेत.करडई पिकाचे सेंद्रिय पद्धतीने उत्पादन घेण्यासाठी भागवतराव गावरान बियाण्याचाच वापर करीत असतात.

पेरणी ते काढणी,कमी मेहनत अधिक नफा आणि फायदे.

करडई हे रब्बी हंगामातील पीक असून, करडईची पेरणी करण्यासाठी एक्करी पाच ते सात किलो बियाणे लागते.करडई हे पीक काटेरी प्रकारचे असल्यामुळे त्याचे रानटी प्राण्यांपासून संरक्षण करण्याची आवश्यकता भासत नाही. करडईचे पीक सेंद्रिय पद्धतीने



घ्यायचे झाल्यास त्याला फवारणी व रासायनिक खते देण्याची देखील आवश्यकता भासत नाही,त्यामुळे शेतकऱ्यांचा आणावश्यक खते व फवारन्यांचा खर्च देखिल वाचतो. सेंद्रिय पद्धतीने लागवड/पेरणी केलेल्या करडई पिकाची पेरणी व काढणी एवढीच मेहनतीची कामे असतात.आजकाल अनेक शेतकरी हार्वेस्टरच्या माध्यमातून पिकांची काढणी करत असतात.एका एक्करमध्ये सेंद्रिय पद्धतीच्या करडई पिकातून साधारणतः चार ते पाच क्विंटल करडईचे उत्पादन मिळत असल्याचे भागवतराव निर्मळ पाटील यांनी सांगितले.सेंद्रिय पद्धतीच्या करडई उत्पादनाचा एक्करी खर्च दोन ते तीन हजारांपर्यंत व उत्पादन पंचवीस हजारांचे मिळत असल्याचे देखील भागवतराव यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

क्विंटलमागे बावीस ते तेवीस किलो तेल व पन्नास ते पंचावन्न किलो पेंढ

सेंद्रिय पद्धतीने उत्पादित केलेल्या एका क्विंटल करडई मागे बावीस ते तेवीस किलो शुद्ध करडईचे खाद्यतेल व पन्नास ते पंचावन्न किलो जनावरांना खाण्यासाठी पेंढ मिळत असल्याचा दावा प्रगतिशील शेतकरी भागवतराव निर्मळ पाटील यांनी केला. करडईचे तेल हे आयुर्वेदिक व गुणकारी स्वरूपाचे असते.त्याचे अनेक फायदे आपल्या शरीराला कळत नकळत होत असतात. आपल्या दहा एक्कर सेंद्रिय करडईच्या उत्पादनातील आवश्यक तेवढी करडई आपण घरी वापरणार असून उर्वरित करडई गरजूंना आपण बाजारभावाने विकणार असल्याचे देखील भागवतराव म्हणाले.भेसळयुक्त तेलापासून आपला बचाव करण्यासाठी सेंद्रिय पद्धतीच्या करडई पासून काढलेले तेल वापरावे असे आवाहन देखील भागवतराव निर्मळ पाटील यांनी शेतकऱ्यांना केले.



## शाळा, महाविद्यालये ही ज्ञानाची केंद्र आहेत - रानबा गायकवाड

### पी. एमश्री जि. प.के.प्रा.शाळा सिरसाळा येथे व्याख्यान संपन्न

सिरसाळा (प्रतिनिधी)

जगाच्या पाठीवर शाळा आणि महाविद्यालये ही ज्ञानाची केंद्रे आहेत.ज्ञान हे बाजारात नाही तर पुस्तके आणि विविध ग्रंथातून मिळते. असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक भीमयुगकार रानबा गायकवाड यांनी केले.ते सिरसाळा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत पीएमश्री योजने अंतर्गत आयोजित व्याख्यान प्रसंगी बोलत होते.

दिनांक २८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झालेल्या या व्याख्यान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मधुकर घोडके हे होते उद्घाटक म्हणून अन्वरखा पठाण( अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती ,तर यावेळी गोविंद कराड( जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी परळी )कवी भागवत काचगुंडे रामभाऊ कडबाने हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी भीमयुगकार रानबा गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तीमत्व विकास याविषयी मार्गदर्शन केले. तसेच राज्य सरकार जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना सर्व सुविधा मोफत उपलब्ध करून देते याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.याप्रसंगी मुख्धयापक मधुकर घोडके, विस्तार अधिकारी कराड सर,भागवत काचगुंडे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष अरबूने,विठ्ठल भुजबळ, नारायण जाधव ,महादेव राजमाने, देविदास पवार, लता चोपडे, मनीषाताई सरवदे, मंगल माळी, महानंदा विटेकर, वर्षाराणी पिंपरखेडकर आदींनी परिश्रम घेतले . कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन आणि आभार लक्ष्मण वैराळ यांनी केले.



## जागतिक मौखिक दिना निमीत्त होळ येथे मौखिक दंत आरोग्य शिबीर संपन्न

केज/प्रतिनिधी

जिल्हा शल्य चिकित्सक बीड,राष्ट्रीय मौखिक आरोग्य अभियान जिल्हा कार्यक्रमाधिकारी डॉ. दबडगावकर सर तसेच उपजिल्हा रुग्णालय केज चे वैद्यकीय अधीक्षक डॉ.दत्तात्रय केंद्रे सर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आदित्य दंत महा विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मौखिक दिनानिमित्त आयोजित सप्ताहाच्या निमित्ताने ग्रामीण भागातील होळेश्वर विद्यालय होळ येथील विद्यार्थ्यांना दंत आरोग्य मौखिक आरोग्य याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करून उपस्थित १५० पेक्षाजास्त विद्यार्थिनींची दंत व मौखिक तपासणी उप जिल्हा रुग्णालयाचे वरिष्ठ दंतशल्य चिकित्सक डॉ. रमण दळवी यांनी केली. तसेच गरजू रुग्णांच्या दातांमध्ये आवश्यक ते

उपचार डॉ.रमण दळवी व आदित्य डेंटल कॉलेजचे डॉ.मंगेश अंधारे यांनीकेले या सर्व शिबिराच्यायशस्वी आयोजना करता जिल्हा रुग्णालय बीडचे दंत सहाय्यक श्रीकांत उजगरे शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक गण यांनी मोलाचे सहकार्य केले.

## सोनीजवळा येथील जल जीवन मिशन योजनेच्या कामात अनियमितता करून

# शासनाची व गावकऱ्यांची आर्थिक फसवणूक केल्याबद्दल बीड मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन

केज/प्रतिनिधी

मौजे सोनीजवळा ता. केज जि.बीड येथील जल जीवन मिशन योजने अंतर्गत जा.क्र मजिप्राम औ/ता.शा.३/२६१३ दि. १४/१२/२०२२ रोजी ४ कोटी तेरा लाख ५१हजार ४०० रुपयांची तांत्रिक मान्यता मिळाली.तसेच दिनांक १५ /१२ /२०२२ रोजी जा.क्र.ग्रा पा पु वी/लेखाकावी२०२२क्रमांक०३१४२/१५/१२/२०२२ नुसार प्रशासकीयमान्यता आदेश मिळाला व ४कोटी १३ लाख ५१ हजार ४०० दरडोई ५०१२ रूपये प्रमाणे तसा संबंधित कामाचा कार्यारंभ आदेश जाक्र / ग्रापापुवि/निविदा / कावी ९९३/क्र. ००७३९/३१/१/०२३ या प्रमाणे मे.कृष्णाई कन्स्ट्रक्शन जानेगाव तालुका केज जिल्हा बीड यांना त्याचा कार्यक्रम आदेश मिळाला परंतु संबंधित कामाचाकार्यारंभ आदेश मिळाल्यापासून ते आज तागायत पर्यंत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद बीड यांना वारंवार भेटून तसेच भ्रमणध्वनीद्वारे संबंधित अधिकारी उप अभियंता,उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिप बीड जेई वापसकंपनीच्या अधिकाऱ्यांना वारंवार सांगून सुद्धा त्यांना तांत्रिक मान्यता प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेशात ज्या नियम अटी व शर्ती लेखी स्वरूपात घालून दिल्या आहेत.त्याचे कुठलेही पालन केलेले संबंधित कामात दिसून येत नाही तसेच संबंधित कामाच्या अंदाज पत्रकानुसार कोणतेही काम झालेले नाही संबंधित कामांमध्ये जी मोजमाप पुस्तिका लिहिलेली आहे अथवा आजपर्यंत जे बिल सदरील कामाचे उचलले आहे त्यामध्ये व प्रत्यक्ष कामांमध्ये तफावत असल्याचे जाणवत आहे.

सदरील कामाचे पाईप लाईनचे काम अद्याप पर्यंत निम्म्यापेक्षा जास्त अपूर्ण आहे पाईपलाईन साठी खोदकाम सुद्धा अंदाज पत्रकाप्रमाणे केलेले नाही.सदरील कामात खूप मोठ्या प्रमाणात अनियमित्ता झाली असून एकही काम अंदाज पत्रकानुसार अथवा मोजमाप पुस्तिकेत जे बिल रेकॉर्ड लिहिलेलेआहे त्याचा कुठेही ताळमेळ बसत नाही व गाडलेले पाईप निकृष्ट दर्जाचे असून पाण्याच्या टाकीचे काम गेल्या दहा ते बारा



दिवसा पूर्वी सुरू केले असून ते अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे संबंधित कामाच्या तपासणी कामी चौकशी समितीने म्हणून चित्रीकरणासहित (इन कॅमेरा) याची चौकशी करावी तसेच शासनाची व सोनीजवळाग्रामस्थांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या संबंधित कंपनीस ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील अधिकारी अभियंता व संबंधित काम करत असलेल्या कंस्ट्रक्शन कंपनी विरोधातशासनाची व ग्रामस्थांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी चौकशी समिती नेमून इन कॅमेरा चौकशी करून संबंधितावर फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हेदाखल करावेत तसेच संबंधित काम दि.१५ एप्रिल पूर्वी पूर्ण करून गावाचा व माता-भगिनींचा पाण्याचा प्रश्न मार्गी काढावा.जर येत्या दि.१५ एप्रिल२०२५ पर्यंत संबंधित चौकशी करून योग्य ती कार्यवाही केली नाही तर त्यानंतर दि.१५ एप्रिल नंतर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल

तरी आपणाकडून अपेक्षा बाळगतो की आपण शासनाची व गावकऱ्याची फसवणूक करून गावकऱ्यांची गेल्या दोन वर्षापासून पाण्यासाठी हाल करणाऱ्या अधिकारी वापस कंपनी व गुत्तेदार यांच्यावर योग्य ती कार्यवाही कराल असे निवेदन दादासाहेब शंकरराव ससाने,अरुण व्यंकटी करपे,शिवाजी रामदास गायकवाड, प्रताप अशोक वैरागे ग्रामपंचायत सदस्ययांच्या वतिने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना निवेदन देण्यात आले आहे.

# आष्टीत आ.सुरेश धस यांच्या वतीने दावत-ए-इफ्तार पार्टी संपन्न

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी ईदगाह मैदान येथे भाजपा आ. सुरेश धस यांच्यावतीने मुस्लिम बांधवांसाठी दावत - ए - इफ्तारचे आयोजन दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी रमजानच्या पवित्र महिन्यात शेवटच्या शुक्रवारी दि.२८ मार्च रोजी आष्टी ईदगाह रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.



मुस्लिम समाजाचा पवित्र महिन्याचे औचित्य साधून भाजपाचे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आ. सुरेश धस हे दरवर्षी मतदारसंघात मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करतात. सर्वधर्मिय जातीय सलोखा जोपासला जावा, समाजा - समाजामध्ये एकता आणि सामाजिक सलोख्याचा विश्वास अधिक दृढ व्हावा या उद्देशाने रोजा इफ्तार पार्टीचे आ. सुरेश धस यांच्यावतीने आयोजन केले जाते. याचेच औचित्य साधून रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील अनेक नागरिकांनी यावेळी आस्वाद घेतला. यावेळी आ. सुरेश धस यांनी उपस्थित मुस्लिम बांधवांना रमजान महिन्याच्याच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी युवा नेते जयदत्त धस, नगराध्यक्ष जिया बेग, डॉ. अजहर बेग, सय्यद तय्यब, प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, यशवंत खंडागळे, एन. टी. गर्जे, बाळू शेठ मेहेर, संजय मेहेर, सेवा निवृत्त नायब तहसीलदार सलीम शेख, नूसरत बेग, टाटा बेग, बब्बुशेठ अत्तार, अज्जू भाई, अस्लम बेग, रिहान बेग, समीर बेग, अज्जू तासकंद, नगरसेवक इर्शन खान, समीर शेख, नगरसेवक शरीफ शेख, इम्रान तांबोळी, शाकिर कुरेशी, शफी कुरेशी, समीर सय्यद, नगरसेवक किशोर झरेकर, चिंटू अग्रवाल, सादिक कुरेशी, रज्जी बेग, पत्रकार जावेद पठाण, सलीम कुरेशी, प्रविण कदम, अँड. रियाज शेख, सय्यद अय्याज, रहीम शेख, पत्रकार आदी हिंदू - मुस्लिम बांधव मोठया संख्येने या इफ्तार पार्टीला उपस्थित होते.

# जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर अशोक थोरात यांचे निलंबन रद्द करा

पाटोदा येथे पत्रकार संघाची मागणी

पाटोदा ।प्रतिनिधी

बीडचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर अशोक थोरात यांच्यावर झालेली निलंबनाची कारवाई ही राजकीय द्वेष व आकसापोटी झालेली असून डॉक्टर थोरात यांच्यासारखा कर्तव्यदक्ष व सर्वसामान्य गोरगरीब रुग्णांसाठी कायम सहकार्य करणारा शल्यचकित्सक बीड साठी नसणे ही ही बाब गोरगरीब रुग्णांचा आधार हिरावणारी आहे त्यामुळे डॉक्टर अशोक थोरात यांचे निलंबन तातडीने रद्द करून त्यांना पुन्हा सेवेत घ्यावे अशी मागणी पाटोदा येथे पाटोदा पत्रकार संघ व बीड जिल्हा पत्रकार संघ पाटोदा शाखेच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली.



या संदर्भात तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की ,बीड जिल्हयाचे कर्तव्यदक्ष जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांचे मंगळवार दिनांक २५ रोजी विधीमंडळात एका आमदार महोदयांनी राजकीय व इतर द्वेषातुन उपस्थित केलेल्या लक्ष वेधीतुन डॉ. थोरात यांच्यावर बिनबुडाचे आरोप केले व त्यानंतर संबंधित आरोग्यमंत्र्यांनी देखील या संदर्भात इतर लोकप्रतिनिधीचे मत जाणुन न घेता व बीड जिल्हयातील एकंदर परिस्थितीचा विचार न करता हा तुघलकी निर्णय जाहिर करण्यात आला, वास्तविक पाहता डॉ. अशोक थोरात हे शल्यचिकित्सक म्हणुन अत्यंत उत्कष्ट पध्दतीने कार्यरत होते. सर्वज्ञम्ज्ञन्य गोरगरीब रुग्णासाठी संपुर्ण जिल्हयातील शासकिय रुग्णालयामध्ये व विशेषतः बीड येथील मुख्य शासकिय रुग्णालयात दर्जेदार उपचार मिळावेत यासाठी ते सातत्याने प्रयत्नशिल असतात. सर्वसामान्य रुग्णाच्या अडीअडचणीत पाठीशी उभा राहणारा व थेट संपर्क ठेवणारे डॉ. थोरात हे एकमेव अधिकारी असुन त्यांच्यावरील निरर्थक आरोपांमुळे केलेली कारवाई तातडीने रद्द करून त्यांच्यावरील निलंबनाची कारवाई रद्द करावी अशी मागणी करण्यात आली आहे याप्रसंगी पाटोदा पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे बीड जिल्हा पत्रकार संघाचे पाटोदा तालुका अध्यक्ष महेश बेदरे पत्रकार पोपट कोल्हे, सचिव अमीर शेख शहराध्यक्ष सुधीर एकबोटे तालुका उपाध्यक्ष रियाज सय्यद, विजय जाधव, संघटक शेख महेशर, सहसचिव राहुल सोनवणे सचिन गायकवाड छायाचित्रकार सखाराम भोसले यांच्यासह पत्रकारांची उपस्थिती होती .



## खोलेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी श्री धनंजय जब्दे , उपाध्यक्षपदी श्रीमती सुरेखा काळे, सचिवपदी श्री सतिश वांगे , कोषाध्यक्षपदी श्रीमती ज्योती शिंदे यांची बिनविरोध निवड

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील खोलेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्थेची संचालक मंडळाची निवडणूक २०२५ - ३० बिनविरोध संपन्न झाली. नवनिर्वाचित संचालकांनी नूतन पदाधिकाऱ्यांची निवड बिनविरोध केली. अध्यक्षपदी धनंजय जब्दे , उपाध्यक्षपदी सुरेखा काळे, सचिवपदी सतिश वांगे , तर कोषाध्यक्षपदी ज्योती शिंदे यांची निवड करण्यात आली.

खोलेश्वर पतसंस्थेच्या नवनिर्वाचीत संचालक मंडळाची बैठक निवडणूक निर्णय अधिकारी आर एस पवार यांच्या उपस्थितीत दिनांक २८/०३/२०२५ रोजी संपन्न झाली. सर्व संचालकांनी अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष पदाची निवडणूक बिनविरोध करण्याचे जाहीर केले.

अध्यक्षपदी खोलेश्वर विद्यालयाचे धनंजय जब्दे , उपाध्यक्षपदी सुरेखा काळे, सचिवपदी सतिश वांगे, कोषाध्यक्षपदी ज्योती शिंदे यांची बिनविरोध निवड झाली. या बैठकीला नवनिर्वाचित संचालक उमेश डोंगे , मधुकर जाधव, रूपाली मुळे, सपना डुकरे, ज्योती शिंदे जाधव, शंकर देशपांडे, अमोल मोरे यांची उपस्थिती होती. पतसंस्थेचे कार्यालयीन कामकाज गोपाळकृष्ण बाभूळगावकर यांनी पाहिले.

बैठकीनंतर पतसंस्थेचे मार्गदर्शक डॉ.अतुल देशपांडे, खोलेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेक जोशी, पर्यवेक्षक सूर्यकांत उजगरे, प्रशांत पिंपळे ,पतसंस्थेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र कुलकर्णी, ज्येष्ठ सभासद वर्षा मुंडे यांनी सर्व पदाधिकारी व नवनिर्वाचित संचालकांचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यापुढेही सभासदांना केंद्रबिंदू मानून त्यांच्या हितासाठी पतसंस्था कार्य करेल व पतसंस्थेच्या उन्नतीसाठी प्रयत्न करेन अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# विद्यार्थी जीवनात असताना अभ्यास केल्यास उत्तुंग यश प्राप्त होते - डॉ. अजयदादा धोंडे

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी येथील आनंद चॅरिटेबल संस्था संचलित कॉलेज ऑफ फार्मासुटिकल सायन्स अँड रिसर्च आष्टी(डी, बी अँड एम फार्मसी) या फार्मसी कॉलेजमध्ये नुकतेच रिदम (ताल) फार्मा फेस्टिवल २०२५ संपन्न झाले. रविवार दिनांक २३ मार्च २०२५ स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण, सांस्कृतिक कार्यक्रम या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अजय दादा धोंडे, सहसचिव आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी व प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. डी. बी. राऊत प्रशासन अधिकारी आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी व डॉ. चंद्रकांत गोसावी प्राचार्य महेश आयुर्वेद महाविद्यालय आष्टी हे होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. अजयदादा धोंडे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी कॉलेजमध्ये असताना विद्यार्थ्यांनी घेतलेल्या प्रवेश संदर्भातील शाखेमधील प्रत्येक विषयाचा अभ्यास व्यवस्थित केला पाहिजे. व्यवस्थित अभ्यास केला तर पुढे येणाऱ्या प्रत्येक परीक्षेमध्ये विद्यार्थी चांगले यश संपादन करू शकतो, विद्यार्थी औषध निर्माण कंपनी मधील मुलाखती असो किंवा इतर फार्मसी संदर्भातील परीक्षामध्ये यश संपादन करू शकतो. विद्यार्थ्याला यश मिळते, चांगल्या प्रकारची नोकरी मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विद्यार्थी जीवनामध्ये असताना अभ्यास करावा व आपल्या आई - वडिलांचे स्वप्न पूर्ण करावे. अभ्यासाव्यतिरिक्त कॉलेजमध्ये होत असलेले वेगवेगळे कार्यक्रम यामधून विद्यार्थ्यांना आपले कला गुण दाखवता येतात व या कलागुणामुळे विद्यार्थी समाजामध्ये चांगले स्थान प्राप्त करतो व त्याच कलागुणांचा विद्यार्थ्यांना जीवनामध्ये खूप फायदाही होतो. त्यामुळे कॉलेज जीवनामध्ये अशा वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रम, स्पोर्ट, वेगळे स्पर्धा परीक्षामध्ये विद्यार्थ्यांनी भाग घेतला पाहिजे असे डॉ.अजयदादा धोंडे यांनी सांगितले.

या फार्मसी कॉलेजमध्ये गेल्या चार दिवस वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम सादर करण्यात आले. पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांनी सर्व वेगवेगळ्या कलाकारांची वेशभूषा परिधान केली होती, दुसऱ्या दिवशी आपल्या संस्कृतीला धरून असलेले वेगवेगळ्या राज्यामधील पारंपारिक वेशभूषा त्यानुसार वेशभूषा परिधान केली होती. या दरम्यान विद्यार्थ्यांचा वेगवेगळे खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या, विद्यार्थ्यांनी या ठिकाणी स्वतः खाण्याचे पदार्थ तयार करून वेगवेगळे खाण्याचे पदार्थांचे दुकाने (स्टॉल) कॉलेजमध्ये लावली होती. सर्व विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या पदार्थाचा आस्वाद घेतला. रविवारी दिनांक २३ मार्च रोजी स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण,




सांस्कृतिक कार्यक्रम झाला. यामध्ये विद्यार्थ्यांनी नाटक, डान्स, गाणे समूहगीत, समूह डान्स असे वेगवेगळे प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. तसेच यावर्षी क्लास ऑफ द इयर २०२५ ची ट्रॉफी डी फार्मसी मध्ये द्वितीय वर्ष डी फार्मसी व बी फार्मसी मध्ये तृतीय वर्ष बी फार्मसी या क्लासने ट्रॉफी जिंकली. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजमधील सर्व प्राध्यापक व इतर सहकर्मचारी यांनी केले होते व नियोजनबद्ध हा सर्व कार्यक्रम पार पाडला. या फार्मसी कॉलेजमध्ये अभ्यासाबरोबरच इतर ही कार्यक्रम घेतले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना इतर कलागुण दाखवता येतात व अशा वेगवेगळ्या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना जीवनामध्ये उपयोग होतो. विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये चांगले यश मिळते व सामाजिक बांधिलकी ही विद्यार्थ्यांना यामधून समजते, यामुळे या कॉलेजमध्ये सर्व प्रकारचे कार्यक्रम घेतले जातात असे कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुनील कोल्हे यांनी सांगितले.



रमजान ईद इफ्तार पार्टी व गुढी पाडवा उपक्रम

# राष्ट्रीय एकात्मता म्हणजे सामाजिक बांधिलकी-प्रा.डॉ. माधव रोडे

परळी (प्रतिनिधी)

राष्ट्रीय सेवा योजना व भौतिकशास्त्र विभाग वैद्यनाथ कॉलेज यांच्या वतीने युवकांसाठी रमजान ईद - इफ्तार पार्टी व गुढी पाडवा निमित्ताने राष्ट्रीय एकात्मता म्हणजे सामाजिक बांधिलकी हा उपक्रम प्रा . डॉ. माधव रोडे यांनी आयोजित केला. यावेळी प्रा. डॉ. जगदीश जगतकर , प्रा. विजय मुंडे , पत्रकार धनंजय आढाव , मोहन व्हावळे , प्रा. संजय रणखांब , प्रा. प्रमोद गीत्ते , सिद्धार्थ रोडे सर , मोहन साखरे , प्रा. कल्याण खोसे , आदि सह महाविद्यालयतील युवक मोठा संख्याने उपस्थिति होते. यावेळी पवित्र रमजान ईद - इफ्तार पार्टी व गुढी पाडवा निमित्ताने हार्दिक शुभेच्छा उपस्थितित प्रा. विजय मुंडे , प्रा. जगदीश जगतकर यांनी दिल्या. या कार्यक्रमात आयोजात प्रा. डॉ. माधव रोडे ,अशिष मुंडे , करण गुट्टे , प्रणव आघाव , सकलेन शेख , सैनक सय्यद , फारूख मुशर्फ , फैज्जन , आकाश फड , विकास राठोड यांनी केले.



# आमदार सुरेश धस आण्णाचे हानुमान म्हणून सर्वत्र परिचित असणारे नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांच्या पाठपुराव्याला यश

**पाटोदा तहसीलच्या संजय गांधी विभागाचा आखेर तळमजल्यावर कारभार सुरू**

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा तालुक्यातील संजय गांधी योजनेचे कार्यालय तळमजल्यावर सुरू करावी अशी मागणी अनेक वर्षांपासून होती आमदार सुरेश आण्णा धस यांच्या आम सभेत ही दिव्यांग बांधवांनी ही मागणी केली होती त्यानंतर पत्रकार गणेश शेवाळे यांनी बातमी छापल्या नंतर पाटोदा नगरपंचायतचे नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांनी आमदार सुरेश आण्णा धस यांच्या जवळ या गंभीर विषयाची चर्चा केल्या नंतर तात्काळ आमदार सुरेश आण्णा धस यांनी सुचना केल्या नंतर पाटोदा तहसीलचे तहसीलदार निलावड साहेब व संजय गांधी विभागाचे नायब तहसीलदार गणेश दहिफळे दिव्यांगाचा त्रास कमी व्हावा म्हणून तात्काळ तळमजल्यावर कामकाज सुरू केल्याने,अनेक लाभार्थी विशेषत: दिव्यांग व्यक्तींना या सोयीमुळे फायदा होणार आहे. अनेक वर्षापासून संजय गांधी विभाग तहसीलच्या तळमजल्यावर घ्यावा अशी मागणी दिव्यांग बांधव करीत होत मात्र कार्यालय कामकाज हालत नव्हते यामुळे यावर आझाद पत्रकार गणेश शेवाळे यांनी आवाज उठवताच आमदार सुरेश धस आण्णाचे हानुमान म्हणून सर्वत्र परिचित असणारे नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांच्या पाठपुराव्याला यश आले आसुन पाटोदा तहसीलच्या संजय गांधी विभागाचा आखेर तळमजल्यावर कारभार सुरू झाल्यामुळे दिव्यांग बांधवांच्या मागणीला यश आले आहे

# राज्यस्तरीय सर्वोच्च श्री वैद्यनाथ रत्न पुरस्कार २०२५ बारा रत्न

## व्यक्तिमत्व यांचा गौरव व मोफत सर्व धर्मीय सामूहिक विवाह सोहळा संपन्न

केज/प्रतिनिधी

दिनांक २६ मार्च २०२५ रोजी परळी वैजनाथ येथे दि.वा.सेवा संस्थान यांच्या वतीने पंचक्रोशी सह राज्यातील प्रतिभावंत, यशवंत,नामवंत व्यक्तीमत्वांना सर्वोच्च श्री वैद्यनाथ रत्न पुरस्कार सन २००९ पासून मुख्य संयोजक दिपक वांजरखेडे हे देत असतात यावर्षी भारताचे पहिले उप पंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अमृत महोत्सवी पुण्यतिथी वर्षा निमित्त भारतासह राज्यातप्रथमच पुण्यतिथीचे औचित्य साधून उपेक्षित घटक, अल्पभूधारक,मजूर, निराधार,आर्थिक दृष्ट्या कमकुवत घटकातील मुलींसाठी सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले होते.त्यात निराधार कन्येचा मोफत शाही विवाह सोहळा संपन्न झाला.त्या अगोदर मंगल कार्यालयमध्ये अनेक मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये आचार्य १००८ महा मंडलेश्वर परमपूज्य श्रीश्री दत्तात्रय महाराजदहिवाळ यांच्या आशीर्वादात त्यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. विकासराव डूबे अध्यक्ष आर्य वैश्य महासभा हे होते तर मुख्य उपस्थिती प्रदीप मुरलीधरराvभोगले सहाय्यक आयुक्त समाज कल्याण



बीड,बाबासाहेब देशमुख सचिवश्रीवैद्यनाथ देवस्थान ट्रस्ट परळी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष श्री.वैजनाथराव जगतकर श्री.ज्ञानोबा माऊली फड अध्यक्ष व्यापारी महासंघ परळी वैजनाथ,श्री.विजय वाकेकर कार्याध्यक्ष मारवाडी युवा मंच व बाल कीर्तनकार ह.भ.प.जनाई महाराज कोकाटे हे उपस्थित होते या सर्वांच्या उपस्थितीमध्ये एकूण १२ रत्न व्यक्तींचा दि.वा.सेवा संस्थान आयोजित श्री वैद्यनाथ रत्न पुरस्कार २०२५ चे सन्मान चिन्ह, सन्मानपत्र,शाल,श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.यात गौरवार्थी आचार्य १००८ महा मंडलेश्वर परमपूज्य श्रीश्री दत्तात्रय महाराज दहिवाळ,दै.लोकशा चे संपादक श्री.विजयराज बंब,शिवूर जिल्हाछत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिध्द डॉ.श्री.विजय महाजन,श्री.संदीप लाहोटी परळी,श्री. राजेश्वर देशमुख परळी, श्री.धनंजय बडवेछत्रपती संभाजीनगर,सुप्रसिध्द कापसे पैठणीचे उद्योजक श्री.बाळासाहेब कापसे येवला,श्री.ड.अशोक कवडे अंबाजोगाई,श्री. विजया दहिवाळ परळी, वैद्यनाथ भक्ती मंडळ परळी,ह.भ.प.गोविंद महाराज मुंडे परळी,श्री. संजय जोशी परभणी तसेच मरणोत्तर पुरस्कार हा सौ.वंदना पारसेवर यांना घोषित होऊन त्यांचे पती श्री.नागनाथ पारसेवार यांनीस्वीकारला यांनतर मोफत शाही विवाह सोहळा संपन्न झाला.तसेच जोडप्याला संसार उपयोगी साहित्य व चोळी बांगडी भेट म्हणून दि.वा.सेवासंस्थांन तर्फे देण्यात आले व नंतर सर्वांना स्नेहभोजन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंतराव मुंडे सर यांनी केले तर मुख्य संयोजक दिपक वांजरखेडे सह अनेकांनी आपले विचार मांडले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ. माधुरी वांजरखेडे,ड. व्हि.डी.वांजरखेडे, बाबासाहेब आव्हाड, राजकुमार डाके,माऊली मुंडे,समीर कुलकर्णी, रामेश्वर महाराज कोकाटे, बालासाहेब जगतकर, संतोष जुजगर,अखिल भारतीय पेशवा संघटना अंबाजोगाई सह विविध संघटना पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# परळी पोलीस बनले 'फास्टरफेणे' : सर्व प्रक्रिया पूर्ण करीत अवघ्या पाच तासात दोषारोपपत्र न्यायालयासमोर !

**सकाळी घडला गुन्हा, तात्काळ आरोपी अटक,दोन तासात परिपूर्ण तपास अन् पाच तासात चार्जशिटच केलं दाखल**

परळी ।प्रतिनिधी

एखादा गुन्हा घडल्यानंतर गुन्हा नोंदविण्याची घंटोन् घंटे चालणारी प्रक्रिया, त्यानंतर आरोपींना अटक करण्यात व त्यानंतर संपूर्ण तपासासाठी खूप मोठा कालावधी लागतो. त्यानंतर बऱ्याच कालावधीनंतर दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले जाते हा पोलीस प्रक्रियेतील नेहमीचा अनुभव आहे. मात्र आज परळी शहर पोलिसांनी एका गुन्ह्यांमध्ये आश्चर्यकारक व अतिशय जलदगती कामगिरी केली असुन सकाळी घडलेल्या गुन्ह्याची संपूर्ण प्रक्रिया व तपास पूर्ण करून अवघ्या पाच तासात या गुन्ह्याचे दोषारोपपत्रच थेट न्यायालयात दाखल केले आहे. या कौतुकास्पद कामगिरीमुळे परळी पोलीस 'फास्टरफेणे' बनल्याचे दिसुन येत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,आज (दि. २८) रोजी परळी शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये सकाळी साडेसहा वाजेच्या दरम्यान कडबा मार्केट वखार महामंडळाच्या मोकळ्या जागेतील झाडेझुडपे असलेल्या ठिकाणी महिलांना अतिशय लज्जास्पद वाटणारा गुन्हा घडला आहे. मोकळ्या जागेतील झाडेझुडपे असलेल्या ठिकाणी प्रात:विधीसाठी काही महिला या गेलेल्या असताना त्या ठिकाणी एक आरोपी हा तिथे दबा धरून बसला होता. प्रात:विधीसाठी बसलेल्या महिलांच्या समोर जाऊन व महिलांना मनाला लज्जास्पद



वाटणारे वर्तन व अश्लील कृती त्याने केल्या.तसेच येणाऱ्या जाणाऱ्या महिलांना वाईट उद्देशाने इशारे केले. या बाबतची तक्रार पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली. त्यावरून गु र न ६७/२०२५ कलम - ७४,७५(२ ),७९ इछड प्रमाणे सकाळी १०.३३ वाजता आरोपी भुजंग वाघमारे वय २८ वर्षे रा.रामनगर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

परळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ यांनी हे प्रकरण गांभीर्यपूर्वक घेऊन दाखल गुन्हातील आरोपीस तात्काळ ताब्यात घेतले. त्याचेकडे व साक्षीदारांकडे तपास करुन आरोपीविरुद्ध पुरावा मिळून आल्याने,वरिष्ठ कार्यालयाकडून कागदपत्राचे पडताळणी करून आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे, दोषारोप नंबर.३३/२५ सह कोर्टात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. न्यायालयात एस एस सी क्रमांक १५१/२५ दि.२८/३/२०२५ असा प्राप्त आहे. या गुन्ह्याचा तपास सपोनि योगेश शिंदे यांनी केला आहे. महिला विषयांच्या प्रकरणांमध्ये तात्काळ कारवाई करण्याचे वरीष्ठचे आदेश आहेत. त्यानुसार परळी पोलीसांनी जलदगती तपास करीत या गुन्ह्याचे दोषारोप अवघ्या पाच तासात न्यायालयासमोर सादर केले आहे. परळी पोलीसांनी अतिशय कौतुकास्पद कामगिरी केली असुन परळीत पहिल्यांदाच इतक्या जलदगतीने गुन्हा घडणे,नोंद होणे,आरोपी अटक, सखोल तपास, पुरावे अन्य प्रक्रिया,वरिष्ठांची पडताळणी आणि न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करणे ही प्रचंड वेळखाऊ प्रक्रिया अवघ्या पाच तासात पुर्ण झाल्याचे उदाहरण बघायला मिळाले आहे.

या प्रकरणात जलदगती तपासासाठी पोलीस अधीक्षक नवनीत, अप्पर पो. अधीक्षक श्रीमती चेतना, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे स्तरावर पो निरीक्षक रघुनाथ, सपोनि योगेश ,नितीन, मपोहे सविता, गोविन्द, किशोर पो. शि.पंडीत, रामकिशन, धनश्री,वर्षा, यांनी कामगिरी केली. जलदगती तपास वेळेत पुर्ण करुन अवघ्या ०५ तासात दाखल गुन्ह्याचे दोषारोप पत्र न्यायालयात सादर केले. याबद्दल परळी शहर पोलीसांचे कौतुक होत आहे.



# राज्यातील ५६० गो शाळांना देशी गोवंश परिपोषण योजनेचा लाभ वितरण म्हणजे नव संजीवनी- बाजीराव ढाकणे

बीड/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी विराजमान झालेले जेष्ठ समाजसेवक श्री.शेखर भाऊ मुंदडा यांनी महाराष्ट्र राज्यातील गोमाता संकटात सापडलेल्या आहेत हे हेरले व गो मातांच्या संगोपनासाठी काही तरी आगळी वेगळी योजना सुरू करण्याचे ठरविले आणि मागिल २ वर्षांपासून अहोरात्र परिश्रम घेत देशी गोवंश परिपोषण योजना कार्यान्वित करण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी व मंत्री महोदय यांच्या सोबत चर्चा करून योजना सुरू केली.या योजनेचा लाभ म्हणून महाराष्ट्रराज्यातील ५६० गोशाळांना गुरुवार दिनांक २७ मार्च २०२५ रोजी जानेवारी,फेब्रुवारी व मार्च या ३ महिन्यांचे अनुदान म्हणून २५ कोटी रुपये संबंधितगोशाळांच्या बॅक खात्यांवर ऑनलाईन पद्धतीने जमा करण्यात आले आहेत.याबद्दल महा एनजीओ फेडरेशन महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा समन्वयक श्री. बाजीराव ढाकणे यांनी श्री.शेखर भाऊ मुंदडा यांचे आभार मानले आहेत.

गोशाळांमधील देशी गायींच्या पालन पोषणा साठी प्रति दिन प्रति गाय ५० रुपये अनुदान योजने अंतर्गत दि.२७ मार्च २०२५ रोजी राज्यातील ५६० गोशाळांमधील ५६५६९ गायींसाठी पहिल्या टप्प्यात २५कोटी ४५ लाख ६९ हजार ५०० रुपये इतके अनुदान महाराष्ट्र गोसेवा आयोगा मार्फतऑनलाईनपद्धतीने लाभार्थी गोशाळांना वितरित करण्यात आले.

देशी गायींची कमी झालेली उत्पादन क्षमता, त्यांचे संगोपन तसेच भाकड किंवा अनुत्पादक गायींचे संगोपन करण्या साठी पशुपालकांना येणार्या अडचणी लक्षात घेऊन गोशाळांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याच्या हेतुने सन २०२४-२०२५ मध्ये महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असणार्या गोशाळांना शासनाने गोवंशपरिपोषण योजना सुरु केली.अनेक गोशाळांना यातून फायदा तर झाला आहेच त्या सोबतच देशी गोवंश संगोपनामध्ये मदत झाली आहे.या महत्वपूर्ण योजने च्या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस,पशुसंवर्धन मंत्री मा.पंकजाताई मुंडे व महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष राज्यमंत्री दर्जा श्री.शेखर भाऊ मुंदडा तसेच सर्व प्रमुख अधिकार्यांचे महा एनजीओ फेडरेशनचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी मन:पूर्वक आभार मानले आहेत.

ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाचा कणा असणार्या देशीगोवंशाला या योजनेच्या लाभामुळे मिळणारी नवसंजीवनी येणार्या काळात देशी गोवंश वृद्धीसाठी आणि संगोपन व संवर्धनासाठी फायद्याची ठरेल.

श्री.बाजीराव ढाकणे सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा समन्वयक, महा एनजीओ फेडरेशन, महाराष्ट्र राज्य.